# मेहता मराठी ग्रंथजगत

मार्च, २०२१
पृष्ठे ६८ किंमत : रु. १५
वर्ष एकविसावे
अंक तिसरा



३ मार्च

तुमच्या स्वप्नांनी दिली उमेद
क्षितिजापार गेली झेप
प्रेरणेचा चढता आलेख असा
घडवत गेला भाग्यलकेर

# श्री. अनिल मेहता

## यांचे ८१व्या वर्षात पदार्पण...



जन्मदिनाच्या
अनंत शुभेच्छा!

मेहता पब्लिशिंग हाऊस | मेहता बुक सेलर्स

# मेहता मराठी ग्रंथजगत

◆ मार्च २०२१ ◆ वर्ष एकविसावे ◆ अंक तिसरा

**संपादक**
सुनील मेहता
**संस्थापक संपादक**
शंकर सारडा
**संपादन साहाय्य**
योजना यादव
**अंकाची किंमत १५ रु.**
वर्गणी मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.
**प्रसिद्धी :**
दरमहा ११ तारखेस
**मांडणी-अक्षरजुळणी**

मेहता पब्लिशिंग हाऊस


## अनुक्रमणिका


| | |
|---|---|
| **संपादकीय** | **४** |
| **विशेष लेख** | **१०** |
| **पुस्तक परिचय** | |
| द इनोसंट मॅन | ३२ |
| शुभ शुभमंगल | ३८ |
| अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज | ४० |
| अ ट्विस्ट इन द टेल | ४२ |
| अखेरची लढाई | ४६ |
| गहाण पडलेली टेकडी | ५० |
| **अभिप्राय** | **५४** |
| **दिनविशेष** | **६१** |



संपादक-मुद्रक-प्रकाशक : सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड, टेलिफोन भवनसमोर,
पुणे ४११ ०३० फोन : ०२०-२४४७६९२४/२४४७५४६२
E-mail : mmgj@mehtapublishinghouse.com

'मेहता मराठी ग्रंथजगत' हे मासिक मालक, मुद्रक व प्रकाशक सुनील अनिल मेहता यांनी जय गणेश ऑफसेट, २०/१डी/१अ, सोमवार पेठ, महाराजा लॉज मागे, पुणे- ४११०११ येथे छापून मेहता होम, १व२ मजला, १९४१, सदाशिव पेठ, पुणे - ४११०३० येथे प्रसिद्ध केले. संपादक - सुनील अनिल मेहता.

'Mehta Marathi Granth Jagat' monthly is owned, Printed & Published by Sunil Anil Mehta, Printed at Jai Ganesh Offset, 20/1D/1A, Somvar Peth, Behind Maharaja Lodge, Pune – 411 011 & Published at Mehta Home, 1 & 2 Floor, 1941, Sadashiv Peth, Pune – 411 030. Editor – Sunil Anil Mehta.

## संपादकीय

# ताळमेळाची अपेक्षा...



नव्या वर्षात रुळताना नव्या संकेतांशी आणि विधींशी ताळमेळ साधण्याची तालीमही सुरू झाली. मराठी साहित्य व्यवहारातला सर्वांत मोठा विधीही नजीक आला. त्या अनुषंगानं उठणारी वादळंही उठली. रंगली. शमली. अध्यक्षपदाच्या दावेदारासाठीची मतंमतांतरं यावर्षीही होतीच; पण ९४व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी ज्येष्ठ वैज्ञानिक आणि लेखक जयंत नारळीकर यांच्या नावावर शिक्कामोर्तब झालं. आणि संमेलनाच्या दिशा-धोरणांवर सुरू होणाऱ्या चर्चांनाही सुरुवात झाली.

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन म्हणजे साहित्य- प्रेमी मराठी रसिकांचा आनंदोत्सव. २६ ते २८ मार्च दरम्यान हा आनंदोत्सव नाशिक नगरीत होत आहे. साहित्य संमेलनाचं व्यासपीठ हे साहित्य व्यवहारातल्या प्रत्येक घटकासाठी महत्त्वाचं. तितकंच ते प्रत्येक साहित्य प्रकारासाठीही महत्त्वाचं. मराठी साहित्यात कथात्म साहित्यात सामाजिक, राजकीय साहित्यानं जशी आपली मुळं घट्ट केली, तशी वैज्ञानिक साहित्याला करता आली नाहीत. वैज्ञानिक साहित्यात मराठीत हाताच्या बोटावर मोजण्याइतकीच नावं आहेत. यासाठी

वाचकांची अभिरुची जबाबदार आहे की मराठी लेखकांची लेखनमर्यादा, या वादात पडण्यात अर्थ नाही; पण वैज्ञानिक साहित्याला साहित्यिक पटलावर स्थान देण्याच्या दृष्टीने संमेलन अध्यक्षपदी जयंत नारळीकरांची निवड अर्थपूर्ण आहे.

कोरोना काळात पुस्तक विक्रीवर आलेलं मळभ दूर करण्याच्या दृष्टीनेही आम्ही प्रकाशक या संमेलनाकडे आस लावून आहोत. साहित्य संमेलनातील पुस्तक व्यवहार प्रत्येक प्रकाशकासाठी आर्थिक हातभार लावणारा असतो. २०२०मध्ये पुस्तक विक्रीवर झालेला परिणाम भरून काढण्यासाठी ही संधी असेल. मागील काही दिवसांत पुस्तक विक्रीला चालना देण्यासाठी प्रकाशक एकत्र आले. त्यातून संयुक्तिक सवलतींच्या अभिनव योजना समोर आल्या. यातून प्रकाशकांमधील एकी पाहायला मिळालीच; पण वाचकांनाही पुस्तक खरेदीची मनसोक्त संधी लाभली. वाचन जागरसारख्या उपक्रमातून प्रकाशकांनी दाखवलेली वाट महत्त्वाची आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या आयोजकांनीही याचा विचार करायला हवा. संमेलनस्थळी फक्त स्टॉल घेऊन विक्री करण्यापुरतं प्रकाशकांचं योगदान मर्यादित न ठेवता प्रकाशकांचा संमेलनातील सहभाग आणखी अर्थपूर्ण करता यायला हवा. यासाठी आयोजकांनी संमेलनातील प्रत्येक घटकाबरोबर ताळमेळ राखणं गरजेचं आहे. नाशिकमध्ये होत असलेल्या संमेलनात या दिशेने नक्की पावलं उचलली जातील, अशी आशा आहे.

३ मार्च, २०२१रोजी मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक श्री. अनिल मेहता ८१व्या वर्षात पदार्पण करीत आहेत. तब्बल अर्धे शतक ते अविरतपणे मराठी प्रकाशन व्यवसायात सक्रिय आहेत. अनुवादाच्या माध्यमातून जगभरचं साहित्य मराठी वाचकांपर्यंत पोहचवण्याचं काम त्यांच्या मार्गदर्शनामुळेच सिद्धीस जात आहे. त्यांच्या वाढदिनी त्यांचं अभीष्टचिंतन करीत असताना, त्यांच्या मार्गदर्शनाखाली आम्ही भविष्यात अशीच वाटचाल करत राहू, असा विश्वास आहे.



## फॉर्म ४ – वृत्तपत्राच्या मालकी हक्कासंबंधीचे निवेदन

| | | |
|---|---|---|
| १) नियतकालिकाचे नाव | : | मेहता मराठी ग्रंथजगत |
| २) प्रकाशन स्थळ | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ३) प्रकाशन काल | : | मासिक |
| ४) मुद्रकाचे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ५) प्रकाशकाचे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ६) संपादक | : | सुनील मेहता |
| राष्ट्रीयत्व | : | भारतीय |
| पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |
| ७) मुद्रण स्थळ | : | जय गणेश ऑफसेट, २०/१डी/ १ए, सोमवार पेठ, महाराजा लॉजमागे, पुणे ४११ ०११ (महाराष्ट्र) |
| ८) वृत्तपत्राची मालकी हक्क/ स्वामित्व इ. चे नाव | : | सुनील अनिल मेहता |
| कार्यालयाचा पत्ता | : | १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० (महाराष्ट्र) |

मी, सुनील अनिल मेहता, असे घोषित करतो की, वरील तपशील माझ्या माहिती व समजुतीप्रमाणे विश्वासपात्र व सत्य आहे.

दि. ९.३.२०२१

सुनील अनिल मेहता
प्रकाशक

# मेहता मराठी ग्रंथजगत

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

**आमच्या छापील अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ४५०रुपये

पंचवार्षिक वर्गणी ६००रुपये

**डिजिटल अंकाची वर्गणी**

त्रैवार्षिक वर्गणी ३००रुपये

पंचवार्षिक वर्गणी ४००रुपये

***Available on***

play.google.com / store / books

www.amazon.in

आमच्या पुस्तकांविषयी आणि नवीन योजनांविषयी जाणून घेण्यासाठी

सर्व ग्रंथालयांना नम्र विनंती

कृपया आपला संपूर्ण पत्ता, (तालुका, जिल्हा, पिनकोडसहित), मेल-आयडी, फोन नंबर, मोबाईल नंबर ही माहिती आमच्या खालील व्हॉट्स अप नंबरवर कळवावी.

**९४२०५९४६६५**

## वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

## बेळगाव / कोल्हापूर

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक,
मूव्ही, गेम्स इत्यादी बरेच काही
आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे.
सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

**बेळगाव, कोल्हापूर येथील वर्डपॉवरचे पत्ते पुढीलप्रमाणे**

कामत टॉवर, पहिला मजला, आरपीडी कॉलेजसमोर,
टिळकवाडी, बेळगाव -५९०००६.
मोबाईल - ७८८८२७७१९०

स्टार बझार, जुना पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१.
मोबाईल - ९५१८९१२२६९

**अधिक माहितीसाठी संपर्क**

**wordpowerbookshop@gmail.com**

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, यूपीएससी, एमपीएससी,
सेट-नेट, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ.
विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ (शनिवारी बंद)
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१
Email : mehtabooksellers@gmail.com

**मेहता पब्लिशिंग हाऊस**

amazon | GET IT ON Google Play | Get it on Apple Books

यांच्या संयुक्त विद्यमाने
नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि अॅन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

इथे मिळतील ई-बुक्स...

**eBooks**

**www.amazon.in**

**play.google.com**

**https://books.apple.com**



**Online** पुस्तके खरेदी करा **www.mehtapublishinghouse.com**

विशेष लेख

## माणसं जोडणारा प्रकाशक...

*मराठीतील एक ज्येष्ठ, कल्पक व नवोपक्रमशील प्रकाशक श्री. अनिल मेहता दि. ३ मार्च, २०२१ रोजी ८१व्या वर्षात पदार्पण करत आहेत. त्यानिमित्त त्यांच्या कार्याचा आढावा घेणारा लेख.*

इंग्लिश भाषेत योगायोगाला एक छान प्रतिशब्द आहे, तो म्हणजे Serendipity; पण serendipity म्हणजे केवळ एक साधासुधा योगायोग नव्हे, ज्याला नुसतं Chance Happening किंवा Coincidence म्हणता येईल, असा योगायोग नव्हे! तर ती एक अनपेक्षितपणे घडून आलेली; पण खूप सकारात्मक, खूप दूरगामी परिणाम करून जाणारी घटना असते! मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल कुमार मेहता, त्यांच्या मित्रपरिवाराचे 'कुमारभाई' आणि मेहता पब्लिशिंग हाऊसमध्ये काम करणाऱ्या सर्वांचे 'पपा' आणि गेली ३४ वर्षे माझे मेंटोर (Mentor) असलेले 'अनिल मेहता सर' यांची आणि माझी भेट होणं अशाच एका अनपेक्षित, विलक्षण आणि माझ्या आयुष्याला वेगळं वळण लावणाऱ्या योगायोगाचं उदाहरण आहे.

आयुष्याच्या वळणावर काही थोडीच माणसं

अचानकपणे दीपस्तंभासारखी आपल्या समोर येतात आणि आपला पुढचा मार्ग प्रकाशमान करतात. आपल्याकडून कसलीही अपेक्षा न ठेवता आपल्यासाठी अविरत पथदर्शकाचं काम करत राहतात. अनिल मेहता सरांबद्दल माझ्या आणि मेहता प्रकाशनाच्या सावलीत मोठ्या झालेल्या अनेक लेखक-अनुवादकांच्या याच भावना आहेत. ३ मार्चला मेहता सरांनी वयाची ८० वर्षं पूर्ण केली. त्या निमित्ताने मनात खूप आठवणी जमा झाल्या आहेत.

आज चौतीस वर्षं झाली त्या गोष्टीला. मी त्यावेळी सत्तावीस वर्षांची होते. गाठीला पूर्वानुभव तर शून्यच होता; पण इंग्लिश भाषेबद्दल आपुलकी होती, त्यातील बारकाव्यांची पुरेशी समज होती, मुख्य म्हणजे आवड होती आणि मातृभाषा मराठीवर विलक्षण प्रेम होतं. त्यामुळे झालं काय की एक दिवस एक मनाला भिडणारी इंग्लिश कादंबरी माझ्या हातात पडली आणि पुढचा-मागचा काहीही विचार न करता मी सरळ तिचा एकटाकी अनुवाद करून टाकला. जसे शब्द सुचले तसे एकापुढे एक मी लिहीत गेले. ती पहिली कच्ची प्रत तयार झाली, घरच्यांनी ती वाचली आणि सर्वांनाच असं वाटलं, की हा अनुवाद प्रकाशित झालाच पाहिजे. मग मी मुंबईहून माझ्या माहेरच्या गावी, म्हणजे पुण्याला आले आणि त्या अनुवादाच्या हस्तलिखिताची फाइल घेऊन प्रकाशकांचे उंबरठे झिजवण्यास सुरवात केली. माझ्यासोबत कुणीतरी वडीलधारं माणूस असावं, म्हणून मी माझ्या सत्तरीच्या घरात असलेल्या सासूबाईंना बरोबर घेतलं होतं. त्याही उच्चविद्याविभूषित, निवृत्त प्राध्यापिका होत्या, पुण्यात त्यांचं नाव सर्वांना ठाऊक होतं; पण या कशाकशाचा काहीच उपयोग झाला नाही. एका अपरिचित लेखकाच्या इंग्रजी कादंबरीचा मराठी अनुवाद छापण्याचा विषय तर दूरच, पण एकही प्रकाशक आम्हाला दारातसुद्धा उभं करून घ्यायला तयार नव्हते. बघता बघता दुपारचे बारा वाजून गेले. घरी परत जावं तर रिक्षा मिळेना! सासूबाईंना उन्हाचा ताप सहन होईना, म्हणून आम्ही टिळकरोडवरच्या एका पुस्तकाच्या दुकानात शिरलो. दुकानाचे मालक सासूबाईंच्या ओळखीचे होते. त्यांना आम्ही आमच्या भटकंतीचं प्रयोजन



सांगितलं. ते म्हणाले, ''पेरूगेट भावेस्कूलच्या शेजारी 'धनश्री अपार्टमेन्ट'मध्ये मेहता प्रकाशनाचं ऑफिस आहे, तिथे जाऊन भेटा!'' मग मी बाहेर येऊन सासूबाईंना रिक्षाने घरी जायला सांगितलं आणि हस्तलिखिताचं बाड घेऊन एकटीच घामाघूम होऊन एकदाची पेरूगेटजवळ असलेल्या मेहता प्रकाशनाच्या ऑफिसात जाऊन पोचले. इथे आलेला अनुभव या आधीच्या अनुभवांपेक्षा अगदीच वेगळा होता. या एका प्रकाशकांनी मात्र अनपेक्षितपणे माझं स्वागत केलं, मला आत बोलावून बसायला खुर्ची दिली, प्यायला पाणी दिलं आणि माझ्या येण्याचा उद्देश विचारला. ते प्रकाशक म्हणजेच मेहता पब्लिशिंग हाऊसचे श्री. अनिल मेहता! त्यांच्या त्या ऑफिसात सगळीकडे पुस्तकंच पुस्तकं होती. भिंतभर उंचीच्या काचेच्या कपाटांमधून पुस्तकं डोकावत होती, त्यांत अनुवादित पुस्तकंही अनेक होती. माझ्या मनातील आशेने परत एकदा डोकं वर काढलं. मी माझ्याकडची हस्तलिखित प्रत अनिल मेहतांच्या हातात देऊन माझ्या येण्याचं प्रयोजन त्यांना सांगितलं. मी म्हणाले, ''तुम्ही नवोदित अनुवादकांना संधी देता, असं मी ऐकलं, म्हणून मी खास तुमच्याकडे आले आहे.'' त्यानंतर त्यांनी माझा एक छोटासा इंटरव्ह्यू घेतला. मग त्यांनी माझं ते हस्तलिखित ठेवून घेतलं.

मध्ये दोन वर्षं गेली. दरम्यानच्या काळात मुंबईहून आमची बदली कोल्हापूरला झाली होती; पण दोन वर्षांनी अचानक मेहता प्रकाशनाच्या कोल्हापूरच्या ऑफिसमधून मला फोन आला. त्यांनी मला कोल्हापूर ऑफिस- मध्ये (म्हणजेच 'मेहता बुक सेलर्स' या त्यांच्या दुकानात) भेटायला बोलवलं होतं. मी जेव्हा तिथे पोचले तेव्हा त्यांनी काहीएक न बोलता फक्त स्मितहास्य करून माझ्या पहिल्या अनुवादित पुस्तकाची प्रत माझ्या हाती ठेवली. अखेर दोन वर्षांनंतर माझा तो अनुवाद प्रसिद्ध झालेला होता. या हेनरी डेंकर लिखित पुस्तकाचा 'विद्रोह' या नावाने प्रसिद्ध झालेला माझा पहिलावहिला मराठी अनुवाद! त्याच्या मुखपृष्ठावर मूळ लेखकाचं नाव ठळक अक्षरांत छापलेलं होतं आणि त्याखाली तेवढ्याच ठळक अक्षरांत माझं नाव झळकत होतं; पण त्या दिवशी एक गमतीची गोष्ट घडली. **मी जेव्हा तिथे पोचले, तेव्हा अनिल मेहता स्वतः ते माझं पुस्तक वाचण्यात दंग होते. त्यांनी ते पुस्तक मला बघायला दिलं खरं; पण नंतर म्हणाले,**

**''अहो, माझी शेवटची काही पानंच राहिली आहेत, तुम्ही उद्या याल का पुस्तक न्यायला? मी हे पुस्तक आज रात्रीत वाचून पूर्ण करीन.'' मला आश्चर्याचा धक्काच बसला.** इतक्या धकाधकीच्या जीवनात कोल्हापूरच्या पुस्तकाच्या दुकानाचा तो प्रचंड पसारा एकट्याने सांभाळत असणाऱ्या त्या इतक्या दिग्गज प्रकाशकाला एका नवोदित अनुवादिकेचा पहिलावहिला अनुवाद वाचून संपवण्याचा उत्साह होता.

मला वाटतं, अनिल मेहता यांच्यासाठी वाचन हे हवा, पाणी व अन्नाइतकंच जीवनावश्यक आहे. त्यांचा पुस्तकांचा व्यासंग दांडगा आहे. कोणत्या अनुवादकाची बलस्थाने काय आहेत, कोणत्या पुस्तकाच्या अनुवादाचं काम कुणाला द्यावं, याचे त्यांचे काही आडाखे ठरलेले असतात आणि त्यामुळेच मेहता प्रकाशनाने प्रकाशित केलेला प्रत्येक अनुवाद मूळ पुस्तकाइतकाच सरस असतो. म्हणूनच तो चोखंदळ वाचकांच्या पसंतीला उतरतो.

तस्लिमा नासरिन या बांग्लादेशी लेखिकेच्या 'लज्जा' या वादग्रस्त पुस्तकाच्या अनुवादाची अवघड जबाबदारी त्यांनी जेव्हा माझ्यावर सोपवली, तेव्हा मी अगदीच नवोदित होते. वयाने व अनुभवाने लहान होते. माझे केवळ तीन अनुवाद त्याआधी प्रसिद्ध झाले होते. सर्वांत महत्त्वाचं म्हणजे अनेक नामवंत लेखकांनी स्वत: अनिल मेहतांना फोन करून 'लज्जा' कादंबरीचा अनुवाद आपल्याला करण्याची संधी द्यावी, अशी विनंतीसुद्धा केली होती. मला 'लज्जा'च्या अनुवादाचं काम देताना त्यांनी स्वत:च मला ही गोष्ट सांगितली.

**''पण मग तुम्ही माझ्यासारख्या अननुभवी अनुवादिकेवर ही जबाबदारी कशी काय टाकलीत?'' मी विचारलं.**

**त्यावर ते हसून म्हणाले, ''कारण तुम्ही मूळ संहितेशी प्रामाणिक राहून काम करता. तुम्ही मेहनती आहात, तुम्ही हे अनुवादाचं काम उत्तम पार पाडाल असा माझा विश्वास आहे.'' त्यांचा हा विश्वास सार्थ ठरला. 'लज्जा'च्या मराठी अनुवादाला महाराष्ट्र राज्य सरकारचा उत्कृष्ट अनुवादाचा पुरस्कार मिळाला.**

माझं वास्तव्य पुढील अनेक वर्षं कोल्हापूरलाच होतं. कोणत्याही अनुवादाचं हस्तलिखित पूर्ण झालं की ते मी त्यांच्या दुकानात घेऊन जात असे. अनिल मेहता ते हस्तलिखित पुण्याच्या ऑफिसला पाठवण्याची

व्यवस्था करत असत. ही ३२-३३ वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. तेव्हा आम्हा लेखकांकडे कुठे लॅपटॉप होते? आम्ही तावच्या ताव हाताने लिहून काढत असू; पण माझं ते हस्तलिखित पुण्याला पाठवण्याआधी त्यातला शब्द न् शब्द ते स्वत: वाचत असत आणि मला फोन करून पसंतीची पावतीसुद्धा देत. एवढंच नाही, तर अनेकदा माझ्यावर एखाद्या पुस्तकाच्या अनुवादाचं काम सोपवल्यावर ते त्यांच्या माणसाला जवळपासच्या स्टेशनरीच्या दुकानात पाठवून माझ्यासाठी कोऱ्या कागदाचे ताव मागवून घेत आणि अनुवादाच्या पुस्तकाबरोबर तेही मला देत. ते घेताना मला खूप संकोच होई; पण त्यांनी जे ठरवलं असेल, त्यापुढे कुणी काही बोलायचं नाही, असा अलिखित नियमच होता.

अनिल मेहतांच्या दुकानात त्यावेळी कै. रणजित देसाई, कै. शिवाजी सावंत, कै. आनंद यादव यांच्यासारख्या दिग्गज साहित्यिकांची ऊठबस असे. सुधा मूर्तींचा आणि त्यांचा आजही असाच स्नेह आहे; पण ज्या सन्मानाने ते त्या मोठ्या लेखकांना वागवतात, तोच सन्मान त्यांच्याकडून लहान वयाच्या, अननुभवी, नवोदित अनुवादकांच्याही वाट्याला येतो. त्यांच्या दृष्टीने कुणी लहान नाही, कुणी मोठं नाही! ते सर्वांशी सारख्याच आपुलकीने आणि आदराने वागतात.

पुढे काही वर्षांनी माझे काही अनुवाद बरेच गाजले, लोक मला नावाने ओळखू लागले आणि मग कोल्हापूर व आसपासच्या परिसरातून वेगवेगळ्या कार्यक्रमांना मला प्रमुख अतिथी म्हणून निमंत्रणे येऊ लागली. अशा वेळी कधी जर कार्यक्रमासाठी बाहेरगावी जायची वेळ आली तर ते माझ्या गाडीसाठी विश्वासातला ड्रायव्हर पाठवून देत, सोबतीला दुकानातील कुणीतरी लेडी स्टाफ मेंबर, शिवाय एखाद्या माणसालाही पाठवून देत. ते माझ्या यजमानांना सांगत, तुम्ही अजिबात काळजी करू नका. माझ्या त्या कार्यक्रमाच्या आधी, तसंच तो कार्यक्रम संपल्यावर अनिल मेहता सरांचा हमखास आठवणीने चौकशीचा फोन येणार, हेही ठरलेलंच! हा अनुभव केवळ माझाच नाही, तर त्यांच्यासाठी काम करणाऱ्या सर्वांसाठीच त्यांच्या मनात अशी आस्था असते. आणि ते काहीच बोलून दाखवत नाहीत; पण ती आस्था त्यांच्या कृतीतून दिसते. त्यांच्यासाठी काम करणारे सर्व कर्मचारीसुद्धा त्यांना त्यांच्या कुटुंबाचेच घटक वाटतात. ते मूळचे मितभाषीच आहेत आणि

आपण कुणासाठी काही केल्यावर ते बोलून दाखवण्याचा त्यांचा स्वभाव नाही; पण मला आजवर जे काही पुरस्कार व मानसन्मान प्राप्त झाले, त्यावेळी अनेकदा ते त्या समारंभाला जातीने उपस्थित राहत असत, अगदी परगावीसुद्धा!

२०११मध्ये आमची पुण्याला बदली झाली आणि आमचं कोल्हापूरचं वास्तव्य संपुष्टात आलं; पण त्यानंतरसुद्धा आजपर्यंत एकदाही माझ्या वाढदिवसाला त्यांचा फोन येणं चुकलेलं नाही. अजूनही माझ्या नवीन पुस्तकाबद्दल दाद देणं, रेडिओ, टी. व्ही. किंवा अलीकडच्या काळात यूट्यूबवर जर माझे काही कार्यक्रम झाले, तर दुकानातून घरी गेल्यावर ते आवर्जून ऐकणं किंवा पाहणं, त्यानंतर लगेच फोन करून ते कळवणं, हे चालूच आहे.

अनिल मेहतांना पुस्तकांबरोबरच  माणसं जोडण्याचा व्यासंग आहे.

मेहता प्रकाशनाचा कोणताही कार्यक्रम हा आम्हा अनुवादकांसाठी स्वत:च्या घरच्या कार्यासारखा असतो. मेहता प्रकाशनातर्फे आयोजित करण्यात आलेला कार्यक्रम कमालीचा शिस्तबद्ध, नेटका असतो. ते स्वत: वेळेच्या बाबतीत इतके काटेकोर आहेत, की ठरलेल्या वेळी कार्यक्रम सुरू झालाच पाहिजे आणि कार्यक्रमातील प्रत्येक मिनिटाचं शिस्तबद्ध प्लॅनिंग हवं, याकडे त्यांचा कटाक्ष असतो. केवळ कार्यक्रमाला प्रसिद्धी मिळावी म्हणून साहित्याशी संबंधित नसलेले राजकारणी नेते किंवा सेलेब्रेटिजना प्रमुख पाहुणे म्हणून व्यासपीठावर आणून बसवणं त्यांना कधीच आवडत नाही. **त्यांच्या पुस्तकांच्या प्रकाशन समारंभात अनेकदा ते त्यांच्या पुस्तकांच्या वाचकांपैकी कोणालातरी व्यासपीठावर बोलावून त्या वाचकाच्या हस्ते पुस्तक प्रकाशन करतात.** वाचकांची अनुवादित पुस्तकांच्या मूळ लेखकांशी प्रत्यक्ष भेट घडावी, वाचकांना त्या लेखकांची स्वाक्षरी व संदेश मिळावा, ही त्यांची मनापासून इच्छा असते आणि त्यासाठी ते त्या लेखकांना सन्मानपूर्वक प्रकाशन समारंभाला निमंत्रण देतात, त्यांची सर्व व्यवस्था करतात.

पण, अशा अनेक कार्यक्रमांत अनिल मेहता यांचं स्वत:चं वागणं पाहून एक गोष्ट लक्षात येते. त्यांना खुर्चीचा मोह अजिबात नाही, स्वत:ची वैयक्तिक प्रसिद्धी व्हावी असं त्यांना कधीच वाटत नाही आणि कार्यक्रमानंतर जेव्हा फोटो काढण्याचं सत्र चालू असतं, तेव्हा तर ते व्यासपीठावरून सरळ

निघून जातात.

वैयक्तिक आयुष्यात अनिल मेहता यांचा आहारविहार, त्यांचं आचरण आणि त्यांची वेशभूषा किती साधी असावी? कितीही मोठा समारंभ असला तरी त्यांच्या अंगात साधा सुती कुर्ता असतो आणि हातात एक कापडी पिशवी. चेहऱ्यावर मात्र नेहमी प्रसन्न हास्य असतं. सकाळच्या नाश्त्याला दशमी आणि चटणी, दिवसातून दोन-तीन वेळा आलं घातलेला बिन साखरेचा चहा आणि दुपारी चहासोबत क्वचित कधीतरी जवळच्या छोट्याशा उपाहारगृहातून मेदूवडा आणि चटणी मागवायची, ही त्यांची आवड. बाकी या वयातही सकाळी नऊ वाजल्यापासून ते रात्री साडेसात-आठ वाजेपर्यंत दुकानाचा व्याप ते जातीने सांभाळतात. मी थकलो, कंटाळलो, मला काम झेपत नाही, हे शब्द मी तरी कधी त्यांच्या तोंडून ऐकले नाहीत.

मोठमोठे नामवंत साहित्यिक असोत, नाहीतर अगदी नवोदित लेखक असोत, सर्वांना त्यांच्या घराचे दरवाजे नेहमी खुलेच असतात. सर्वांचं अगत्य अगदी सारख्याच पद्धतीने होतं. मी गेली चौतीस वर्षं सातत्याने फक्त मेहता प्रकाशनच्या बॅनरखालीच काम केलं, यामागेसुद्धा हीच गोष्ट कारणीभूत आहे. एक तर मेहता प्रकाशनातर्फे प्रकाशित होणारं पुस्तक हे दर्जेदारच असणार आणि ते निर्दोष, देखण्या स्वरूपात येणार, त्याचप्रमाणे ते केवळ महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातच नव्हे तर पार साता समुद्रापलीकडेही जाऊन पोचणार, प्रकाशनासाठी काम करणाऱ्या अनुवादकांना अत्यंत प्रोफेशनल वागणूक मिळणार, हे असे मानदंड अनिल मेहतांनी सुरवातीपासूनच घालून ठेवलेले आहेत. आज मेहता प्रकाशनाचा व्याप प्रचंड वाढलेला आहे. मेहता पब्लिशिंग हाऊस ही महाराष्ट्रातील पहिल्या क्रमांकाची प्रकाशनसंस्था आहे. संस्थेचे मॅनेजिंग डायरेक्टर म्हणून काम पाहणारे श्री. सुनील मेहता यांनीसुद्धा ही परंपरा चालू ठेवलेली आहे आणि दर्जा कायम टिकवला आहे.

अनिल मेहता सरांच्या ८१व्या वाढदिवसाला मी ईश्वराकडे अशीच प्रार्थना करेन, की ऊर्जासंपन्न अशा अनिल मेहता सरांना प्रदीर्घ आयुरारोग्य लाभो आणि त्यांनी स्थापन केलेल्या मेहता प्रकाशनाचा विस्तार आणखी वृद्धिंगत होवो.

**— लीना सोहोनी**
leena.n.sohoni@gmail.com

# सहस्त्रचंद्र दर्शनाच्या दिशेने...

*श्री. अनिल मेहता ८१व्या वर्षात पदार्पण करत आहेत. या ८० वर्षांतील सुमारे सहा दशकांहून अधिक काळ अनिल मेहता आणि डॉ. अनिल गांधी या दोन अनिलांचं मैत्र टिकून आहे. डॉ. गांधी हे मेहता पब्लिशिंग हाऊसच्या वाटचालीचे साक्षीदार आहेत आणि श्री. अनिल मेहता यांच्या जीवनप्रवासाचेही साक्षीदार आहेत. या दोन्ही कारकिर्दींचा डॉ. गांधी यांनी घेतलेला आढावा.*

मार्च महिना म्हणजे वर्षाचा ताळेबंद मांडायचा महिना; पण दरवर्षी ३ मार्चला आम्ही एक वेगळाच ताळेबंद मांडतो. हा ताळेबंद साठी ओलांडलेल्या एका मैत्रीचा ताळेबंद असतो. माझा मित्र अनिल मेहता, प्रथितयश प्रकाशक, व्यावसायिक ३ मार्च, २०२१ला वयाची ८० वर्षे पूर्ण करतो आहे. त्या निमित्ताने त्याचा मित्र या नात्याने त्याच्या आयुष्याच्या प्रवासाचा लेखाजोखा घेण्याचा हा प्रयत्न.

अनिलचं बालपण निपाणी या कर्नाटक-महाराष्ट्राच्या सीमेवरच्या छोट्या गावात गेलं. वडिलांचा स्टेशनरी आणि पुस्तक विक्रीचा छोटा व्यवसाय. अनिल एसएससी पास झाल्यानंतर त्याच्या वडिलांनी पुण्यात फर्ग्युसन कॉलेजमध्ये शास्त्र शाखेला प्रवेश मिळवून दिला. आपला मुलगा डॉक्टर व्हावा ही त्या प्रेमळ पित्याची इच्छा. अनिलला मात्र शास्त्र शाखेची किंवा डॉक्टर होण्याची इच्छा नव्हती; पण वडील सांगतील तेच करण्याची त्या वेळची पद्धतच होती. हे विषय आवडत नसल्याने कॉलेजला दांडी मारून नाटके, सिनेमा पाहण्याचा छंद लागला. बरेच वेळा एका दिवसात तीन सिनेमांचा आनंद लुटला. वर्षाअखेर निकाल काय लागला असेल हे सांगण्याची गरजच नाही. अपेक्षेप्रमाणे तो नापास झाला. गणितात तर चक्क शून्यच!

अनिलला व्यापाराविषयी मात्र मनापासून गोडी होती. व्यापार-उद्योग या विषयाचा अभ्यास करून आपल्याला आयुष्याचं गणित सोडवायचं आहे हे

त्यानं मनाशी पक्कं ठरवलं आणि शास्त्र शाखेतनं यशस्वी माघार घेऊन कॉमर्सच्या अभ्यासासाठी बीएमसीसीला प्रवेश घेतला आणि बी.कॉम.ची पदवी यशस्वीरीत्या मिळवली. घरचा व्यवसाय छोटा असल्याने, पण त्या व्यवसायाचे बाळकडू लहानपणापासून कळत-नकळत मिळालेले असल्याने त्यांनी १९६५ साली कोल्हापूर येथे पुस्तकाचाच व्यवसाय सुरू केला. निपाणीच्या दुकानाचे नाव 'अजब स्टोअर्स' असल्याने कोल्हापूरच्या पुस्तक दुकानाचे बारसे त्याच धर्तीवर 'अजब पुस्तकालय' असे झाले.

घरची परिस्थिती खाऊनपिऊन सुखी अशी असली तरी, कोल्हापूरसारख्या मोठ्या शहरात जागा घेऊन व्यवसाय उभारणीस साजेशी नक्कीच नव्हती. त्यांचा आतेभाऊ भिकूलाल दोशी आणि टोबॅको किंग नावाने परिचित धनवान पण दिलदार व्यक्ती देवचंदजी शहा यांनी अनिल मेहता यांना आर्थिक साहाय्य केले. ते फारच मोलाचे होते. विनातारण कर्ज देणारे सावकार दुर्मिळच. या आर्थिक पाठबळाचा योग्य तो उपयोग करून अजब पुस्तकालयाची मुहूर्तमेढ भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर येथे रोवली गेली.

अनिलचा स्वभाव उमदा. बोलण्यातला गोडवा आणि विनम्रता याच्या जोडीला व्यावसायिक हातोटीची सुरेख साथ लाभली होती. 'पुस्तक नाही' असे उत्तर ग्राहकास कधीच द्यायचे नाही. मी तुम्हाला हे पुस्तक दोन-तीन दिवसांत आणून देतो हे आश्वासन देई आणि प्रसंगी झीज सोसूनही ग्राहकाला ते वेळेत उपलब्ध करून दिले जाई. 'ग्राहक देवो भव' या भावनेने प्रेरित होऊन व्यवसाय केल्यानंतर यशोदेवता गळ्यात माळ घालतेच हे त्यांनी हेरले होते. मोठ्या प्रमाणात पुस्तक विक्री करायची तर शैक्षणिक संस्थांशी तारा जुळविणे आवश्यक असल्याचे भान अनिलला होते. कोल्हापूर आणि परिसरातली शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे त्याने पिंजून काढली आणि आपल्या लाघवी स्वभावानं आणि व्यावसायिक कौशल्यानं स्वत:चं स्थान निर्माण केलं.

खरे उद्योजक व्यवसायवृद्धीसाठी Forward Intigration किंवा Backword Intigration या तंत्राचा अवलंब करतात, हे जाणून अनिलनं

प्रकाशन व्यवसायाकडे वळायचं ठरवलं. १९७०मध्ये पेरूगेटजवळ धनश्री अपार्टमेन्टमध्ये पहिल्या मजल्यावरच्या एका छोट्या फ्लॅटमध्ये या प्रकाशन व्यवसायाचा शुभारंभ केला. आमचे कॉलेज जीवनातील एक मित्र आनंद जकाते (यादव) हे एव्हाना 'झोंबी' लिहून एक प्रथितयश लेखक म्हणून प्रसिद्धी पावले होते. त्यांनी अनिल मेहतांना प्रकाशन व्यवसायात उतरण्यास नुसते उद्युक्त केले असे नाही तर स्वत:ची पुस्तकेही दिली. अशा प्रकारे प्रकाशन व्यवसायाची पायाभरणी झाली.

विनम्रता, मैत्री वाढविण्याचे कसब, गैरफायदा न घेण्याचा स्वभाव व चोख आर्थिक व्यवहार यांमुळे त्यांना अनेक नामवंत लेखक मिळत गेले. रणजित देसाई, विश्वास पाटील, अरुण शौरी, सुधा मूर्ती, कमलाबाई ओगले अशी खूप लांबलचक यादी सांगता येईल. यातले अरुण शौरी यांचा परिचय त्यांच्या पुस्तकाच्या भाषांतराच्या प्रकाशनाच्या निमित्ताने झाला; पण मैत्री कलेकलेने वाढतच गेली ती गैरफायदा न घेण्याच्या आणि व्यावहारिक बाबी चोखपणे पाळण्याच्या त्यांच्या स्वभावामुळे.

बापाची चप्पल मुलाला येऊ लागली की मुलालाही आपल्या व्यवसायात सामील करून घेण्याची आपली परंपरा. या न्यायाने मुलगा सुनील बी.कॉम. होऊन आला तेव्हा त्यानं पुण्यातील संपूर्ण प्रकाशन व्यवसाय सुनीलच्या हाती सुपूर्द केला. सुनीलनेही व्यवसायाला चार चाँद लावले. आज मेहता पब्लिशिंगची स्वत:च्या मालकीची भव्य वास्तू जादूगार रघुवीर यांच्या बंगल्याच्या शेजारील रस्त्यावर दिमाखाने उभी आहे. सुनीलने व्यावहारिकता उत्तम सांभाळली आहे.

प्रकाशन व्यवसायात अग्रणी होणं आणि आपलं स्थान टिकविणं यासाठी अनेक परकीय भाषांतील उत्तमोत्तम ग्रंथांची भाषांतरे प्रसिद्ध करणे, नव्या पिढीतील इंग्रजी भाषेचा प्रभाव पाहून त्यांनी इंग्रजी पुस्तकांच्या प्रकाशन क्षेत्रातही चंचूप्रवेश करून व्यावसायिकतेचं आणखी एक पाऊल टाकलं आहे. आजकाल सर्वच व्यावसायिकांच्या प्रांत, देश स्तरावर संघटना कार्यरत असतात. जे उत्तम व्यावसायिक असतात त्यांना अशा संघटनांतून मानाचे स्थान मिळते.




**अखिल भारतीय प्रकाशक संघामध्ये अनिलनं सर्वोच्च पद मिळविलं आहे.**

व्यावसायिक जीवनाबरोबरच अनिलचं वैयक्तिक आयुष्यही यशोमार्गावर मार्गस्थ आहे. पुण्याला कॉलेजमध्ये शिकत असताना रवींद्र व्होरा, सुधाकर पाटील, रमण गांधी आणि मी अशी अनिलसोबत आमची गट्टी जमली. यातील सुधाकर पाटील हे बँक ऑफ महाराष्ट्रचे एक उच्च पदाधिकारी आणि डॉ. रमण गांधी (अकलूज) हे तारे निखळले तर डॉ. रवींद्र व्होरा हे बालकांचे शल्य चिकित्सक सांगलीत असतात. मी पुण्यात सर्जन म्हणून कार्यरत आहे. वयाच्या ७०व्या वर्षीपर्यंत हातात लेखणी न धरणाऱ्या आपल्या या मित्रास लेखनाला उद्युक्त करून त्याच्याकडून पंधरा पुस्तकांचे लिखाण करवून घेण्याची जादूही अनिलनी करून दाखवली आहे.

**कॉलेज जीवनात आम्ही मित्र एकत्र आलो. पुण्यातील डेक्कन परिसरातील 'कॅफे गुडलक'वर चहा-खारीचा स्वाद घेत गप्पांचा अड्डा असे. या अड्ड्यावरच आमच्यातलं मैत्र बहरत गेलं. कॅफे गुडलक आजही त्याच जागी आहे; पण निरनिराळी शहरं, देश हिंडून निरनिराळ्या जागी स्थायिक झालेल्या आम्हा मित्रांमधला संवाद अजूनही ताजा आहे.** आजही रवींद्र व्होरा, अनिल आणि माझी मैत्री तितकीच घनिष्ट आहे. डोक्यावर घनदाट काळ्या केसांचं जाळं असताना जुळलेली मैत्री विरळ रुपेरी केसांपर्यंत टिकून आहे.

अनिलला कॉलेज जीवनात गणित विषयात जरी एकदा शून्य मिळाला असला तरी आयुष्याचं गणित त्यानी अतिशय कुशलतेनं सोडवून या गणितात शंभर टक्के गुण मिळविले आहेत. आज ८०व्या वर्षाची सीमा ओलांडली आहे, त्यांच्या शंभरीलाही सदिच्छा देऊयात!


**– डॉ. अनिल गांधी**

ganilgulab@gmail.com

## Man,
## Beyond the Boundaries of
## Age and Limitations

Firstly, Apologies for writing this letter in English. I particularly choose this language as Baba, my grandfather is known and celebrated beyond Maharashtra. A bookseller, A Publisher from Kolhapur reaching heights not only in Marathi, but in overall Publishing-Bookselling industry in India on a Pan Level. From Kerala to Delhi, each of a publisher has encountered his life, even on Federation Of Indian Publisher's Level.

A 3rd of March is always due awaited excitement for all the right reasons. The Personality we are talking about here is nothing short of an Inspiration. From hard work-ethics and open to acceptance of new thoughts and thinking beyond the boundaries of age and limitations. These factors make my grandfather the most



inspirational figure in the family.

Bookselling is difficult, has always been difficult piece of work in the Business. It is in fact as difficult as pulling out a rabbit from a hat, and more difficult than publishing the book. With new age line of computers and software, publishing a book can be easier. On the Other Hand, in the similar scenario - with such fancy life in 2021, bookselling never got easier. With reviews or expertise staff, in the age of ratings and bloggers, telling the value of a story and importance of academic books is still a bookseller's job. Baba has captured his moment of glory, in a sheer masterpiece of his art to handle his business.

During the lockdown times, while I was in Kolhapur we got to spend a lot of time with each other. I feel lucky to be in the entire unit of our family that we could do it. As



**Three Generations of Mehta Publishing House**
**From left, Akhil Mehta, Anil Mehta and Sunil Mehta**

mentioned earlier, his versatility of acceptance of new thoughts comes when we had to watch some good OTT shows together. We would binge hours of streaming Red Flag shows. In fact when he said I love Nawazuddin Siddiqui I was surprised he had not watched Gangs of Wasseypur. Can you imagine we watched it together and he loved it. Both of us were lucky enough to be with each other when 'Aga Bai, Kakubai, Sasubai' shoot was halted, making it very obvious, it never turned up on the TV.



Upgrading his life from Mono Speaker Radio to JBL Bluetooth is just what I do to help him, ease his life. Music is essential part of his life, but often work takes the priority call even at this age. Making good use of cell phones like OnePlus can be a difficult task at his age, but he uses it like a boss with all easiness. Maintaining his health to his regular - thorough routine, he always makes his own Aura.

Hope he keeps inspiring us and be long enough to see us through his eyes of light. Wish you many more years of life with Happiness and Prosperity.

Happy Birthday.

Your Loving Grandson,
**– Akhil Mehta**
akhil@mehtapublishinghouse.com


## विशेष लेख



### संमेलनाचा विज्ञानयोग!

> *महाराष्ट्रात साहित्य संस्था आणि साहित्य संमेलने यांच्या नाड्या ज्यांच्या हातात असतात, ते नेहमीच शहाणपणाने वागतात, असा लौकिक आणि अनुभव नाही.*

या पार्श्वभूमीवर नाशिक साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाची पालखी ज्येष्ठ वैज्ञानिक जयंत नारळीकर यांच्या दारात नेल्यामुळे आणि त्यांनी हा सन्मान मान्य केल्यामुळे बऱ्याच मंडळींचे बरेच पापक्षालन आणि पुण्यसंचयन एकदम झाले, असे म्हणावयास हरकत नाही. तशीही, नाशिक ही धर्मनगरी आहेच. तिथे आता नारळीकरांच्या निवडीने विज्ञानाला आणि विज्ञानविचाराला साहित्याच्या व्यासपीठावर प्रमुख स्थान मिळते आहे, ही अतिशय आनंदाची आणि मराठी साहित्याच्या वाटचालीच्या दृष्टीने लक्षणीय घटना आहे. साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मतपेटीच्या सापळ्यात अडकून राहिले असते तर डॉ. नारळीकर या वाट्याला कधीच गेले नसते, हेही या निमित्ताने लक्षात ठेवायला हवे. किंबहुना, आधीचे दोन्ही म्हणजे अरुणा ढेरे आणि फादर दिब्रिटो हे सर्वसंमत अध्यक्षही मतदारांच्या पसंतीसाठी फिरतील, अशा स्वभावाचे नव्हतेच. तेव्हा हा एक चांगला पायंडा पडतो आहे. दुर्गा



भागवत या १९७५मध्ये कराड साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष झाल्या, तेव्हा त्यांनी केलेला आणीबाणीचा निषेध सर्वांच्या लक्षात आहे. मात्र, याच भाषणात त्यांनी मराठीतील विज्ञानकथांच्या प्रवाहाचा उल्लेख करून जयंत नारळीकर यांचा विशेष गौरव केला होता. साहित्य संमेलनाच्या व्यासपीठावर झालेला नारळीकरांचा गौरव त्यांना त्याच संमेलनाचे अध्यक्षपद देऊन सार्थ ठरविण्यास मराठी समाज आणि सारस्वताने ४५ वर्षे लावली. यावरून, मराठी साहित्य आणि संस्कृतीची एकूण इयत्ता सर्वांनी मनोमन जोखावी, हे बरे.

डॉ. नारळीकर हे अचानक आणि अपघाताने घडलेले, पण आपली नाममुद्रा कोरलेले साहित्यिक आहेत. 'नारायण विनायक जगताप' या उलट्या क्रमाने आपल्या नावाची आद्याक्षरे होणाऱ्या टोपण नावाने त्यांनी विज्ञानकथा स्पर्धेत भाग घेतला. मराठी विज्ञान परिषदेच्या या स्पर्धेत या कथेला पहिले पारितोषिक मिळाले आणि नारळीकरांच्या कथा व कादंबऱ्यांचे एक नवे दालन उघडले गेले. तसे पाहिले तर मराठीतली पहिली विज्ञानकथा 'मनोरंजन' या मासिकात इ. स. १९१५मध्ये प्रकाशित झाली, असे मानले जाते. श्रीधर बाळकृष्ण रानडे यांच्या कथेने सुरू झालेला हा प्रवास एव्हाना शतक उलटून गेले असले तरी फारसा जोमदार नाही, हे कबूलच करायला हवे. साहित्य व्यवहारात असणारे सारेच त्याला जबाबदार आहेत. त्यात लेखक, प्रकाशक, वाचक, माध्यमे, विक्रेते, माध्यमांतर करणारे सर्जनशील कलावंत, हे सारेच आले. नारळीकर हे अध्यक्ष झाल्यामुळे ही परिस्थिती बदलण्याच्या दिशेने चार पावले पुढे पडतील का, या प्रश्नाच्या उत्तरात त्यांना अध्यक्षपद देण्यातले खरे यशापयश दडलेले आहे. विज्ञाननिष्ठ समाज बांधणे ही सोपी गोष्ट नसते. तसा तो झाला असता तर अमेरिकेत मुखपट्टी न लावता हजारो लोक मरण पावले नसते. भारतही गेली अनेक दशके तंत्रज्ञानाच्या नवनव्या लाटा झेलतो आहे. मात्र, तंत्रज्ञानाचे उपयोजन आणि वैज्ञानिक दृष्टी या दोन स्वतंत्र गोष्टी आहेत, याचे भान दिसत नाही. नारळीकरांनी 'चार नगरांतले माझे विश्व' या विलक्षण ओघवत्या आणि साहित्य अकादमीचा पुरस्कार

मिळालेल्या आत्मकथनाचा समारोप करताना 'विज्ञानप्रसार आणि अंधश्रद्धानिर्मूलन यांच्या मागे लागताना पदोपदी जाणवते की, आपल्या सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या समाजावर देखील अंधश्रद्धांचा पगडा आहे,' असे खेदाने म्हटले आहे. मात्र, लगेच संस्कृत सुभाषिताचे उद्धरण देऊन त्यांनी 'कितीही विघ्ने कोसळली तरी शहाणी माणसे आपले नियतकर्तव्य सोडत नाहीत' असाही उतारा त्याला जोडला आहे.

असे कर्तव्य नारळीकर जन्मभर विविध माध्यमांमधून करत आले आहेत. त्यांनी विज्ञानप्रसाराला डौलदार, अर्थवाही मराठी भाषा दिली. भाषणे, लेख, कथा, मुलांची शिबिरे हे सारे मार्ग चोखाळले. 'महाराष्ट्र टाइम्स'मध्येही त्यांनी बरेच लेखन केले आहे. त्यांना आवडणाऱ्या सौम्य इंग्रजी विनोदाप्रमाणे ते गमतीने 'व्याख्यानबाजी' असे आपल्याच भाषणांना म्हणतात खरे; पण त्यांनी हे व्रत अनेक दशके सांभाळले. नारळीकरांचा वैज्ञानिक आणि अंधश्रद्धानिर्मूलनाचा विचार संस्कृती आणि काही विशिष्ट अर्थांनी धर्मही नाकारत नाही. त्यामुळेच, तो संतुलित, उदार आणि समाजाचा साकल्याने विचार करणारा आहे. आजचे महाराष्ट्राचे विचारविश्व कमालीचे गढूळ, कोते आणि ऱ्हस्वदृष्टीचे बनले आहे. त्याला ज्ञान, विज्ञान आणि तत्त्वज्ञानाच्या विशाल क्षितिजांचे निदान दर्शन तरी घडविण्याची गरज आहे. ते घडविण्याची क्षमता आणि अधिकार जयंत नारळीकरांकडे आहे. त्यांच्या निवडीने महाराष्ट्रातील एका उज्ज्वल परंपरेला नवी दिशा मिळते आहे. मात्र, हे पाऊल केवळ प्रतीकात्मक राहता कामा नये. मराठी साहित्य आणि संस्कृती व्यवहारांचा पुढचा प्रवास या नव्या दिशेने होत राहिला तरच साहित्य संमेलनाचा हा विज्ञानयोग सार्थकी लागेल.

**– साभार, महाराष्ट्र टाइम्स**

■

**कष्टकरी समाजाचं जगणं रेखाटणारा लेखक महादेव मोरे...**

*शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे नुकताच प्रथितयश लेखक महादेव मोरे आणि मेहता पब्लिशिंग हाऊसचे संस्थापक अनिल मेहता यांच्याशी गप्पांचा कार्यक्रम रंगला. मोरे यांनी यावेळी आपल्या लेखन प्रेरणेवर प्रकाश टाकला तर श्री. अनिल मेहता यांनी मराठी प्रकाशन व्यवसायाची वाटचाल आणि सद्यःस्थितीबाबत विवेचन केलं.*

महादेव मोरे हे मराठीतील प्रथितयश लेखक. त्यांच्या नावावर पंचेचाळीसहून अधिक पुस्तके आहेत. निपाणी या सीमाप्रदेशातील छोट्या गावात राहून आणि पोटासाठी गॅरेज, पिठाची गिरणी असे



कष्टाचे लहानसहान कामधंदे करीत हा लेखक लिहीत राहिला. या लेखकाचा जगण्याशी सतत संघर्ष राहिला आहे. निपाणीने त्यांना भरभरून प्रेम दिले. त्यांच्या कामाची कदर करणारे लोक त्यांना या छोट्या गावात भेटले. त्यामुळे त्यांचा संघर्ष थोडा सुकर झाला. मोरे यांचा जन्म जून, १९३९चा. म्हणजे आज ते ८२ वर्षे वयाचे आहेत. दोन वर्षांमागे सायकलवरून जाताना चक्कर येऊन पडले. त्यात त्यांना कायमचे अपंगत्व चिकटले. हिंडण्याफिरण्यावर मर्यादा आल्या. त्यातूनही आमच्या आग्रहाखातर आणि आमचे सन्मित्र डॉ. रमेश साळुंखे यांनी प्रेमाने त्यांची सर्व जबाबदारी घेतल्याने ते कोल्हापूरला आले. त्यांच्याकडे जवळपास पन्नास वर्षांतील मराठी साहित्य व्यवहारातील घटना-घडामोडी मुखोद्‌गत आहेत. त्या त्यांनी आम्हाला सांगाव्यात हे त्यांची मुलाखत घेण्यामागचे एक कारण होते. निमित्त केवळ भाषासंवर्धन पंधरवड्याचे मिळाले. त्यांची त्या पद्धतीने मुलाखत घेण्याची जबाबदारी साळुंखेसरांनी स्वीकारल्यामुळे ही मुलाखत होऊ शकली.

महादेव मोरे यांच्या आस्थेचे विषय कोत्या वृत्तीच्या पांढरपेशी जगाबाहेरचे आहेत. त्यांना आयुष्यभर कष्टकरी सामान्य माणसाविषयी कुतूहल वाटत आले. त्यामुळे त्यांनी आपली लेखणी त्यांची सुख-दुःखे लिहिण्यासाठीच वापरली. समाजात पदोपदी अपमानाचे, संघर्षाचे जीवन जगणारे आणि जीवनाचे हलाहल पचवत दिवस ढकलणारे लोक त्यांच्या कथाकादंबरीचे विषय झाले. शेतकरी, कामगार, मजूर, ड्रायव्हर, क्लीनर, मेकॅनिक, जोगते, जोगतिणी, वारयोषिता अशा पददलित लोकांचे एक विशाल जग त्यांनी आपल्या लेखनातून साकारले. हे लोकच महादेव मोरे




यांच्या लेखनाची ऊर्जा बनले.

कथा, कादंबरी, ललितलेख, कविता, व्यक्तिचित्रे, प्रासंगिक लेख, पुस्तकांचे परिचय असे सर्व प्रकारचे लेखन महादेव मोरे यांनी भरभरून केले. 'चिताक,' 'तुझी कथा माझे शब्द', 'बत्ताशी', 'दवना', 'फर्दी', 'बेंडल', 'गबरु', 'तिंगाड', 'चकवा' असे पंधराहून अधिक कथासंग्रह, 'झोंबडं', 'एकोणिसावी जात', 'पाव्हणा', 'रैत', 'बळी', 'वर आभाळ खाली धरती', 'वस्ती', 'इंगाट', 'प्रवाह', 'स्टँड', 'आडगार', 'काळोख' अशा पंधराहून अधिक कादंबऱ्या, 'चेहऱ्यामागचे चेहरे', 'जगता-जगता', 'माणसं'सारखे ललितलेखसंग्रह असे विपुल लेखन त्यांच्या नावावर आहे. त्यांच्या साहित्याचे इतर भाषांमध्ये अनुवाद झाले. अनेक विद्यापीठांत त्यांची पुस्तके अभ्यासक्रमात लागली. त्यांच्या साहित्यावर वेगवेगळ्या विद्यापीठांत तीन-चार पीएच.डी. पदव्या देण्यात आल्या आहेत. त्यांना आजअखेर अनेक मानसन्मान मिळाले आहेत.

या वयातही हा लेखक भरभरून बोलतो. न कंटाळता गप्पा मारतो. 'मी बोलताना मध्ये मला थांबवू नका' असे म्हणतो. आमच्या प्रश्नाबाहेरच्याही खूप गोष्टी गप्पांच्या ओघात सांगून जातो.

**— नंदकुमार मोरे,** प्राध्यापक, शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर

■

## एक बाप असाही
## मुलाच्या वाढदिवसाला रुग्णालयास पुस्तकांची भेट

आपल्या मुलाच्या वाढदिवसाला आपण काय करतो? आजूबाजूची चार लहान मुलं बोलावतो. त्यांच्या समक्ष आपल्या मुलाचे औक्षण करतो, मुलाला नवीन कपडे घेतो आणि एक केक कापतो व शुभेच्छा देतो. आणि मुलाचा वाढदिवस झाला म्हणून आनंद मिळवतो; पण एक बाप असाही भेटला मुलाच्या वाढदिवसाला ग्रामीण रुग्णालयास पुस्तके भेट देणारा. रुग्णाला ॲडमिट केल्यानंतर त्या रुग्णाच्या नातेवाइकांचा वेळ दवाखान्यात कसा

जाईल याचा विचार करून अनोख्या पद्धतीने पुस्तक संच भेट देणारा बाप भेटला पन्हाळ्याच्या अवघ्या दोनशे उंबरा असणाऱ्या धबधब्याच्या वाडीत. रोहित पाटील त्यांचे नाव. ते कोल्हापूर येथील 'मेहता बुक सेलर्स' या दुकानात कामाला आहेत; पण त्यांच्या अंगात सामाजिक जाण ठासून भरली असल्याचे जाणवले. रोहित यांचा परिचय झाला पन्हाळा येथील एका अनाथ मुलांच्या आश्रमात. जनतेने राशन द्यावे, असे मी सोशल मीडियावर केलेले आवाहन रोहित यांनी वाचले व मला फोन करून सांगितले, की माझ्याकडे घरचं भात (तांदूळ) आहे. आश्रमातील मुलांना द्यायची माझी इच्छा आहे. रोहित यांनी ही अनमोल मदत केली आणि रोहितबरोबर परिचय वाढला. त्यांची व माझी फोनवर भेट होत असे. दोघांनीही एकमेकांना पाहिलं नव्हतं. जानेवारीत शेवटच्या आठवड्यात मला रोहितने फोन केला व सांगितलं की २फेब्रुवारीला माझ्या मुलाचा वाढदिवस आहे. मला पन्हाळ्याच्या ग्रामीण रुग्णालयात काही वाचनीय अशी पुस्तके भेट द्यायची आहेत. दोन वर्षांपूर्वी आम्ही पन्हाळा ग्रामीण रुग्णालयात एक  लायब्ररी सुरू केली होती. पत्रकार संघाचे अध्यक्ष बाळासाहेब भोसले व मी काही पुस्तके या ठिकाणी देऊन एक अनोखा उपक्रम राबविला होता. दोन वर्षांनंतर धबधबेवाडीच्या रोहित यांनी मुलाच्या वाढदिवसाच्या निमित्ताने याच उपक्रमाचा कित्ता गिरवला. मला आनंद झाला. काही पुस्तके घेऊन पत्नी सौ. रेश्मा, चिरंजीव विराज आणि वरद यांना घेऊन रोहित २ फेब्रुवारीच्या सकाळी ११ वाजता ग्रामीण रुग्णालयात हजर झाले. मी या रुग्णालयात अधीक्षक असलेल्या डॉ.



गायकवाड यांना आधीच कल्पना दिली असल्याने त्यांनी वैद्यकीय अधिकारी डॉ. (सौ.) जाधव यांना सांगितले होते. त्यानुसार रोहित यांनी मुलाच्या हस्ते वाढदिवसाची अनोखी भेट दिली. पुस्तके हा महत्त्वाचा भाग असून, त्यामागे असणारा उद्देश लाख मोलाचा होता. रुग्णाच्या सेवेला असणाऱ्यांना थोडा वेळ काही वाचायला मिळेल या उद्देशाने ही पुस्तके रोहित यांनी दिली आहेत. मुलाच्या वाढदिवसाला सामाजिक भान ठेवणारे वडील ग्रेटच.

(रोहित पाटील संपर्क क्रमांक ९७६३९९९०३८)

– **राजू मुजावर,** पन्हाळा


**नवी संहिता... नवा आशय...**

# प्रिस्क्रिप्शन्स फॉर लिव्हिंग

सुखी, प्रेममय जीवनासाठी प्रेरणादायी धडे

**बर्नी सिगल**

अनुवाद : **डॉ. अस्मी अच्युते**




मनमोकळं जगणं शिकवणाऱ्या डॉक्टरनं दिलेलं सुखी जीवनाचं प्रिस्क्रिप्शन..सुखी, सर्जनक्षम आयुष्याचा मागोवा घेणाऱ्या लोकांना अंतर्दृष्टी बहाल करणारं, 'Love, Medicine & Miracles' व 'Peace, Love & Healing' या लोकप्रिय पुस्तकांच्या लेखकाचं नवं पुस्तक...


**किंमत : २९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**


# संभाजी कादंबरी इंग्रजीत !

छत्रपती संभाजी महाराज यांची कर्तृत्ववान, वादळी कारकीर्द, विश्वास पाटील लिखित ‘संभाजी’ कादंबरीतून वाचकांच्या भेटीस आली. मराठी वाचकांकडून उदंड गौरविली गेलेली ऐतिहासिक कादंबरी आता इंग्रजी वाचकांसाठीही उपलब्ध होत आहे. ‘संभाजी’ कादंबरी ॲमेझॉनच्या Eka Westland या कंपनीने नुकतीच इंग्रजीत प्रकशित केली आहे. ती वाचकांना amazon.in /westlandbooks इथे मिळू शकेल.

या कादंबरीचा गौरव करताना आजचे प्रसिद्ध अर्थतज्ज्ञ व The Ocean of Churn या बेस्ट सेलर ग्रंथाचे लेखक संजीव सान्याल म्हणतात की, ‘एक आफ्रिकन म्हण असे सांगते की, जोपर्यंत सिंहाच्या छाव्यांची गोष्ट सांगणारे चांगले कथालेखक मिळत नाहीत, तोवर त्यांची शिकार करणाऱ्या शिकारबहाद्दरांचाच गौरवपूर्ण इतिहास लिहिला जातो. आजवर भारताचा इतिहाससुद्धा हा देश जिंकणाऱ्या आणि पादाक्रांत करणाऱ्या लोकांच्याच दृष्टिकोनातून लिहिला गेलेला आहे. त्यामुळेच विश्वास पाटील यांच्यासारखा प्रतिभावंत लेखक आमच्या इतिहासातील एक निर्णायक पर्व घेऊन वाचकांच्या भेटीस येतो, तेव्हा मला खूप आनंद वाटतो.’






# द इनोसंट मॅन

**जॉन ग्रिशॅम** । अनुवाद : **संजय गडकरी**

■

*पोलिसांनी एकांगीपणे केलेल्या घोर, गंभीर आरोपामुळे निरपराध बेसबॉल खेळाडूचे जीवन उद्ध्वस्त झाले त्याची चित्तथरारक सत्यकथा*

अडा हे ओक्लाहोमाच्या ग्रामीण भागातलं, साधारण सोळा हजार लोकवस्ती असलेलं एक छोटं गाव. ‘बायबल बेल्ट’ म्हणून ओळखला जाणारा पट्टा अडामधून जातो. वेगवेगळ्या बारा पद्धतीने पाळल्या जाणाऱ्या ख्रिश्चन धर्माची चर्चेस या गावात

आहेत. गावातली माणसं सर्वांशी मैत्रीने वागतात. कोणी अडचणीत असल्यास त्याला मदत करायला ते सदैव तयार असतात. १९८०च्या दशकाच्या सुरुवातीला गावात दोन निर्घृण खून झाले नसते, तर अडा गाव बाकी देशांच्या लक्षातही आलं नसतं आणि पोन्टोटॉक काउंटीच्या चांगल्या समाजाला तेच जास्त आवडलं असतं.

डेबी कार्टर ही इथल्या 'कोचलाइट' नावाच्या नाइट क्लबमध्ये अर्धवेळ काम करणारी कॉकटेल वेट्रेस होती. अडा हायस्कूलमधून पदवीधर झालेली, एकवीस वर्षांची अविवाहित तरुणी. दिसायला आकर्षक, गडद केस, सुडौल बांधा, एखाद्या खेळाडूसारखी शरीरयष्टी असलेली डेबी, तरुणांत आवडती होती. ती खूपच स्वतंत्र विचारसरणीची होती आणि एकटीच एक अपार्टमेंट भाड्याने घेऊन राहत होती.

८ डिसेंबर, १९८२ रोजी सकाळी, ती तिच्या राहत्या घरात मृतावस्थेत आढळली. तिच्यावर अमानुष बलात्कार करून तिचा खून करण्यात आला होता.

पोलीस तपास सुरू झाला; पण त्यांना कुठलाच सुगावा लागत नव्हता की काहीच निष्पन्न होत नव्हतं. खुनाच्या आदल्या रात्री तिला 'ग्लेन गोअर' या माणसाबरोबर पाहिल्याचं बऱ्याच साक्षीदारांनी सांगितलं, पण पोलिसांनी त्याकडे पूर्ण दुर्लक्ष केलं.

या खुनामुळे अडा हादरलं. जरी अडाला हिंसा किंवा खुनांचा भला मोठा इतिहास असला, तरी त्यांमध्ये बळी पडलेले लोक बहुधा गुंड, भटके, चोर किंवा अशाच प्रकारचे असायचे; पण एका तरुणीचा बलात्कार करून निर्घृण खून हा प्रकार भयानकच होता. कित्येक महिने पोलीस तपासात काहीच प्रगती नव्हती. पोलीस अगदी मेटाकुटीला आले होते. त्यांच्यावरचा तणाव खूप वाढला होता आणि त्यातच एप्रिल १९८४मध्ये अडा गावात आणखी एका तरुणीचा खून झाला.

डेबीच्या खून प्रकरणात काहीच मागमूस लागत नसतानाही, अचानकच पोलिसांनी रॉन विल्यमसन हा खुनी आहे हे ठरवून पावलं टाकायला सुरुवात केली. हिंसेचं प्रमाण पाहून, या गुन्ह्यांत दोघांचा सहभाग असावा, असा समज करून घेऊन पोलिसांनी रॉनचा मित्र 'डेनिस फ्रिट्झ' यालाही यात अडकवलं. डेबीच्या घरातून घेतलेल्या ठशांमधला एकही ठसा रॉन किंवा डेनिस यांच्याबरोबर जुळत नव्हता, प्रत्यक्ष बघणारे साक्षीदार नव्हते आणि कोणी

कसला आवाजही ऐकला नव्हता.

दोन ‘अनिर्णायक’ पॉलिग्राफ चाचण्या, वाईट ख्याती, बळीच्या घरापासून फारसं दूर नसलेलं निवासस्थान आणि त्याला त्या रात्री क्लबमध्ये बघितल्याचं सांगणारा एकमेव साक्षीदार ‘ग्लेन गोअर’; यापलीकडे रॉनच्या विरोधात पोलिसांकडे काहीही नव्हतं.

डेनिस फ्रिट्झच्या विरोधातला पुरावा तर याहीपेक्षा कमकुवत होता. अत्यल्प पुरावा, कमी पुरावा, शून्य पुरावा.... काहीही फरक पडत नव्हता, कारण ते अडा होतं. तिथे पुराव्याला कधीच महत्त्व नसायचं.

रॉन अडामध्येच लहानाचा मोठा झाला होता आणि इतर गावकऱ्यांप्रमाणेच बरेच पोलीससुद्धा त्याला त्याच्या पूर्वीच्या बेसबॉल खेळामुळे ओळखायचे. १९८३पर्यंतसुद्धा, सर्वांत जास्त फी देऊन टीममध्ये घेतला गेलेला तो एकमेव खेळाडू होता. १९७१मध्ये जेव्हा त्याला ‘ओकलँड ए’ या संघात घेण्यात आलं, तेव्हा रॉनसहित सर्वांनाच असं वाटलं होतं की, ओक्लाहोमामधून तयार झालेला तो दुसरा ‘मिकी मॅन्टल’ ठरू शकतो. त्याच्यासारखाच एक सर्वोत्तम खेळाडू बनू शकतो; पण बेसबॉल इतिहासजमा झाला होता. पोलिसांच्या दृष्टीने तो आता प्रचंड प्रमाणात दारू आणि अमली पदार्थांच्या व्यसनाधीन असलेला, विचित्र वागणारा, आपल्या आईबरोबर राहणारा एक बेरोजगार गिटारवादक होता. त्याचा घटस्फोट झाला होता आणि तो मानसिक विकारांनी त्रस्त होता.

दोघांनाही परवडत नसल्यामुळे त्यांना सरकारतर्फे वकील देण्यात आले. रॉनचा वकील अंध होता, त्याचा उमेदीचा काळ संपला होता आणि बरेचदा दुपारच्या सुट्टीनंतर न्यायालयाचं काम चालू असताना तो डुलक्या काढायचा.

७ डिसेंबर, १९८२ या खुनाच्या रात्री पूर्ण वेळ रॉन घरातच होता, हे सिद्ध करू शकणारी एकमेव साक्षीदार, त्याची आई जुआनिता, मरण पावल्यानंतर हा खटला चालू करण्यात आला. रॉन मनोरुग्ण असल्याचा खटल्यात कधीही उल्लेखही झाला नाही. तुरुंगातल्याच काही कैद्यांना खोट्या साक्षी द्यायला लावून, दोघांनाही दोषी शाबित करण्यात आलं. डेनिसला जन्मठेपेची शिक्षा झाली, तर रॉनला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्याता आली.

रॉनला मॅकॲलिस्टर इथल्या तुरुंगात म्हणजेच मृत्युकोठडीत हलवण्यात आलं. नाहीतरी कैदी इथे मरायलाच आलेत ही भावना

असल्यामुळे, औषधोपचाराला तिथे प्राधान्य नव्हतं. मनोविकृतीवर योग्य उपचार मिळत नसल्यामुळे त्याची मानसिक आणि शारीरिक परिस्थिती खालावू लागली. तो तासन्तास वेड्यासारखा किंचाळत असायचा, काहीबाही ओरडत राहायचा. काही वेळा मनगटाच्या नसा कापून, तर एकदा आपली गादी पेटवून त्याने आत्महत्येचा प्रयत्न केला. लवकरच तो एका खप्पड म्हाताऱ्यासारखा दिसू लागला.

रॉनला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आल्यामुळे त्याच्या अपील्सची प्रक्रिया आपोआपच सुरू झाली होती; पण ती फारच संथ होती. सर्वच अपील्स अगदी यंत्रवत फेटाळली गेली. त्याच्या शिक्षेची तारीख आणि वेळ पक्की करण्यात आली. त्याच्याकडून वेगवेगळे अर्ज भरून घेण्यात आले, त्यातला एक तर त्याच्या शवाची विल्हेवाट कशी लावावी याबद्दलही होता. शेवटी मृत्युदंडाला फक्त पाच दिवस उरलेले असताना 'हेबीयस कॉर्पस'च्या अर्जाचा निकाल लागून त्याच्या शिक्षेला स्थगिती मिळाली.

नंतर जसजसा त्या न्यायालयाने रॉनच्या खटल्याचा अभ्यास करायला सुरुवात केली, तशा त्यांना त्यात असंख्य त्रुटी आढळून आल्या आणि त्यांनी नव्याने खटला चालवण्याचे आदेश दिले. 'इनोसन्स प्रोजेक्ट' या नावाने चुकीची दोषसिद्धी झालेल्यांना वाचवण्याचं काम करणाऱ्या एका गटाने डेनिसचं प्रकरण स्वीकारलं. शेवटी डीएनए चाचण्यांच्या आधारे, बारा वर्षे तुरुंगवास भोगून झाल्यावर दोघांची मुक्तता झाली आणि त्याचबरोबर 'डीएनए'च्या साहाय्याने ग्लेन गोअर हाच दोषी आहे, हेही सिद्ध झालं.

एवढं होऊनही अडाचे पोलीस आणि सहकारी वकील, रॉन आणि डेनिस या दोघांना निरपराध मानायला तयार नव्हते. त्या दोघांच्या विरोधात पुन्हा कधीही कारवाई होऊ शकते, असंच ते भासवत होते. शेवटी या सगळ्याला कंटाळून त्या दोघांनी अडा काउंटी, ओक्लाहोमा राज्य, सरकारी वकील, पोलीस, काही तुरुंगाधिकारी या सर्वांच्या विरोधात १०० मिलियन डॉलर्स एवढ्या रकमेचा नुकसानभरपाईचा दावा दाखल केला. ते प्रकरण दोन्ही पक्षांना मान्य होईल अशा रकमेची तडजोड करून न्यायालयाबाहेर मिटवण्यात आलं.


२००४ मध्ये तुरुंगातून सुटल्यानंतर पाच वर्षांनी रॉनला 'लिव्हर सिरॉसिस' झाल्याचं निदान झालं. शस्त्रक्रिया अशक्य, उपचार अशक्य आणि अवयव प्रत्यारोपणही अशक्य असलेला हा आजार म्हणजे त्याला

सुनावण्यात आलेली आणखी एक मृत्युदंडाची शिक्षा होती, पण यात शारीरिक वेदना फार जास्त होत्या. शेवटी ४ डिसेंबर, २००४ रोजी रॉन मरण पावला. एका दुःखद जीवनाचा अंत झाला आणि अखेर तो खऱ्या अर्थाने 'मुक्त' झाला.

तीन वर्षांपूर्वी 'द इनोसन्ट्स' या चरित्र चित्रणाच्या एका पुस्तकासाठी रॉनने लिहिलं होतं : 'मी आशा करतो की, मी स्वर्गातही जाणार नाही वा नरकातही जाणार नाही. माझी इच्छा आहे की, माझ्या मृत्यूच्या वेळी मला अशी झोप लागावी की, ज्यातून मला कधीच जाग येऊ नये आणि कधीही वाईट स्वप्नं पडू नयेत. 'चिरविश्रांती', आपण थडग्यांवरील काही शिलालेखांवर वाचतो तशी; इतकीच माझी अपेक्षा आहे. आता परत मला न्यायनिवाड्यातून जायचं नाही, पुन्हा कोणी माझा निवाडा करावा असं मला वाटत नाही.'

**नवी संहिता... नवा आशय...**

# द म्यूट अँक्लिट्




**राधिका नाथन**

अनुवाद : **माधुरी परांजपे**

हिंदुस्थानातील अठराव्या शतकाचा काळ. म्हैसूरच्या राजाच्या छत्रछायेत वाढलेल्या आणि हिंदुस्थानाविषयी कमालीचा जिव्हाळा असणाऱ्या उमा ब्रुकला एका ब्रिटिश कॅप्टनशी विवाह करावा लागतो आणि एका नाट्याची सुरुवात होते. एका ऐतिहासिक पैंजणाचा रहस्यमय प्रवास आणि हळुवार फुलत जाणारं रोमांचक प्रेम यांची अलवार गुंफण असलेली विलक्षण प्रेमकथा..


**किंमत : ४००/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## नवी संहिता... नवा आशय...

# फॅक्टरी गर्ल्स

**लेस्ली टी. छांग**

अनुवाद : **गौरी देशपांडे**




चीन म्हणजे १३ कोटी स्थलांतरित कामगारांचं वसतिस्थान. त्यातले सगळेच तिशीच्या आतले. अशाच भविष्याची स्वप्नं घेऊन तोंगकुआनला आलेल्या दोन बहिणींची ही गोष्ट. स्वस्त चिनी मालाच्या निर्मितीसाठी होणाऱ्या कामगारांच्या शोषणाचा भयावह चेहरा उघड करणारी सत्यकथा.

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**


# आगमन

**सुनील दांडेकर**




जारणमारण..करणी..भूतबाधा..बळी देणे..अशा अघोरी विद्येभोवती विणलेल्या कथानकातून गूढ, अज्ञेय विश्वात घेऊन जाणाऱ्या, वाचकाला शेवटपर्यंत खिळवून ठेवणाऱ्या तीन लघुकादंबऱ्यांचा संग्रह...

**किंमत : २६०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**




# शुभ शुभमंगल

**तारा पार्कर-पोप** । अनुवाद : **उषा महाजन**

*वैवाहिक जीवनाबद्दलच्या चुकीच्या समजुतींना जोरदार धक्का देणारं समर्पक स्पष्टीकरण. वैवाहिक सौख्याची गुपितं स्पष्ट करणारी आणि शुभमंगलला अधिक 'शुभ' करणारी हमखास मात्रा... 'शुभ शुभमंगल'*

## पति-पत्नीमधील बंध दृढ होण्यासाठीचं सर्वांगीण मार्गदर्शन

पती-पत्नी हे एक फार नाजूक नातं असतं. आज परदेशात हे नातं टिकवण्यात तेथील दांपत्य यशस्वी होत आहेत. किंबहुना, घटस्फोटांचं प्रमाण ज्या परदेशात जास्त होतं, तिथे ते घटायला लागलं आहे. आपल्याकडे, भारतात

मात्र हे प्रमाण वाढताना दिसतंय. तर हे नातं टिकण्यासाठी, ते अधिक सुंदर होण्यासाठी काय करावं याचं मार्गदर्शन करणारं पुस्तक आहे, The Science of a Good Marriage – For Better. तारा पार्कर-पोप यांनी ते लिहिलं आहे. 'शुभ शुभमंगल' हा त्याचा मराठी अनुवाद मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केला आहे. अनुवादक आहेत उषा महाजन.

आजच्या काळात पुरुषांबरोबरच स्त्रियादेखील कुटुंबाचा आर्थिक भार उचलत असतात. घर आणि नोकरी या दोन्ही आघाड्या सांभाळताना त्यांना खूपच कसरत करावी लागते. लग्नापूर्वी तशी मर्यादित असणारी जबाबदारी लग्न झाल्यावर मात्र दुप्पट होते. दिवसेंदिवस कमी न होता ती वाढत असते. त्यातून स्वतःसाठी, नवऱ्यासाठी वेळ काढणे अशक्य होते आणि इथेच वैवाहिक नात्यातील संघर्षाला सुरुवात होते. पति-पत्नी ही संसाररथाची दोन चाके आहेत. काही वेळा वाद, मतभेद, भांडण यामुळे ही चाके कुरकूर करू लागली तरी प्रेम, सामंजस्य यांचं वंगण घालून ती चाकं चालती ठेवणं महत्त्वाचं. वाद, मतभेद टोकाला जाऊ न देणं महत्त्वाचं. या नात्यात काही वेळा योग्य-अयोग्यतेच्या सीमारेषा कळत नाहीत. त्याविषयी सदर पुस्तक मार्गदर्शन करतं.

वैवाहिक नात्यात निर्माण होणाऱ्या समस्या, त्यांचे परिणाम यांचा विचार करत असतानाच त्यावरील उपाययोजनांचाही विचार केला आहे. या समस्या निर्माण होण्यासाठी कोणती कारणं आहेत याचा आढावाही सदर पुस्तक घेतं. सुखी वैवाहिक जीवनासाठी पती-पत्नी दोघांनीही आपली कर्तव्यं, जबाबदाऱ्या कशाप्रकारे पार पाडणं आवश्यक आहे, त्याचप्रमाणे नात्याकडून आपल्या काय अपेक्षा आहेत, त्या अधिक अवास्तव नाहीत ना, याचा बारकाईनं विचार करण्यात आला आहे. वैवाहिक बेबनावाची परिणती ते नातं संपुष्टात येण्यात होऊ शकते; परंतु पती-पत्नीनं एकमेकांना जर चांगली साथ दिली, तर मात्र हेच नाते अधिक दृढ होऊन पुढे फुलत जाण्याची अधिक शक्यता असते. या पुस्तकाच्या उपयुक्ततेविषयी अनुवादक उषा महाजन यांनी लिहिलं आहे, 'विवाहसंस्थेवर पसरू लागलेलं घटस्फोटाचं सावट अजूनही दूर होऊ शकेल. परत एकदा आशेची किरणं दिसू लागतील. प्रत्येक पती-पत्नीने मग ते नवविवाहित असू दे की, लग्न होऊन बराच काळ उलटलेली जोडपी वा लग्न करू इच्छिणारी तरुण मुलं-मुली असू दे; हे पुस्तक खरंच सर्वांनी वाचलंच पाहिजे. पुस्तकातून मिळणारे धडे, प्रश्नावली प्रत्येकालाच नवी दिशा दाखवतील, नवदृष्टी देतील यात शंकाच नाही. डोळसपणे केलेलं सखोल वाचन नक्कीच प्रत्येकाचं मार्गदर्शक बनेल, याची मला खात्री वाटते.

सुखी यशस्वी जीवनाचा मूलमंत्र म्हणून निश्चितच या पुस्तकाकडे बघता येईल. ■

## पुस्तक परिचय




# अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज

**जेफ्री आर्चर ।** अनुवाद : **लीना सोहोनी**

*धूर्तपणे रचलेलं कथानक आणि रेशमी शैलीत वाचकांना गुंगवणाऱ्या मास्टर एन्टरटेनर जेफ्री आर्चर यांच्या उत्कंठावर्धक कथा...*

जेफ्री आर्चर यांचा 'अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज' हा कथासंग्रह शीर्षकाला अगदी सार्थ ठरवणारा आहे. जेफ्रीच्या भात्यातला प्रत्येक बाण अगदी धारदार आहे. या बारा कथांमधील प्रत्येक कथा वाचकांच्या मनावर जबरदस्त परिणाम घडवून आणते. कथालेखनात जेफ्री आर्चर यांचा हात कुणीच धरू शकणार नाही.

त्यांच्या कथेचा शेवट नक्की कसा होणार आहे याचा अगदी शेवटच्या ओळीपर्यंतसुद्धा वाचकाला अंदाज येऊ शकत नाही.

या पुस्तकातील बारा कथांपैकी प्रत्येक कथा एका वैशिष्ट्यपूर्ण ठिकाणी, एका वैशिष्ट्यपूर्ण वातावरणात घडते. मग ते ठिकाण प्राचीन बेथलहेम असो नाहीतर ब्राझीलमधील पंचतारांकित हॉटेल असो. एक गोष्ट तर उघडच आहे, या प्रत्येक ठिकाणाचा, तसंच गोष्टीत चित्रित केलेल्या कालखंडाचा जेफ्री आर्चर यांनी तपशीलवार अभ्यास केलेला आहे. त्या संदर्भात पुष्कळ संशोधन केलेलं आहे. जेफ्री यांच्या कथांचे विषयही अत्यंत वैविध्यपूर्ण असतात. प्रेम, राजकारण, विनोद यांपैकी कोणत्याही विषयावरील त्यांची कथा तेवढीच रोचक आणि उत्कंठावर्धक असते. जेफ्री आर्चर यांना 'मास्टर स्टोरीटेलर' असं म्हटलं जातं; कारण विंचवाचा डंख जसा त्याच्या शेपटीच्या टोकात असतो, त्याचप्रमाणे जेफ्री यांच्या प्रत्येक कथेचा शेवट वाचकांची मती गुंग करून टाकणारा असतो. शेवटच्या क्षणी त्यांची कथा असं काही अनपेक्षित, वेगळंच वळण घेते की, वाचकाला आधी त्याचा काही अंदाजच येऊ शकत नाही. 'अ क्विव्हर फुल ऑफ ॲरोज' हा कथासंग्रहही याला अपवाद नाही.

सोदबीज्च्या लिलावगृहामध्ये खरेदीसाठी आलेल्या एका कलासक्त रसिकाला, एका लहानशा संगमरवरात कोरलेल्या चिनी मूर्तीमध्ये एक विलक्षण रहस्य दडलेलं सापडतं. अभिजात साहित्याच्या अभ्यासात रममाण होणारा एक तरुण आणि एक तरुणी परस्परांशी स्पर्धा, हेवेदावे आणि चढाओढ करता करता एकमेकांमध्ये असे काही गुंतून जातात, की तो अनुबंध त्यांच्या मृत्यूनंतरही तुटत नाही. न्यूयॉर्कच्या एका पंचतारांकित मेजवानीच्या वेळी अनपेक्षितरीत्या एका लेखकाची गाठ त्याच्या जुन्या चाहत्याशी पडते आणि ती त्याला भूतकाळात घेऊन जाते.

या बारा कथांमधून मास्टर स्टोरीटेलर जेफ्री आर्चर वाचकांना एका अद्‌भुत दुनियेची सफर घडवतात. या कहाण्या अवचित भेटलेल्या अनोळखी कनवाळू व्यक्तींच्या आहेत, डोंगराएवढ्या यशाच्या आणि खोल गर्तेत घेऊन जाणाऱ्या अपयशाच्या आहेत, विश्वासघाताच्या आहेत, जिवापाड प्रेमाच्या आहेत. प्रत्येक कथेचा शेवट हा मानवी जीवनाइतकाच वैविध्यानं भरलेला आणि चमत्कृतीपूर्ण आहे. उत्कंठावर्धक, अनुभवसंपन्न, अतर्क्य, आशयघन अशाच शब्दांत यातील प्रत्येक कथेचं वर्णन करावं लागेल!




# अ ट्विस्ट इन द टेल

**जेफ्री आर्चर** । अनुवाद : **लीना सोहोनी**

*धूर्तपणे रचलेलं कथानक आणि रेशमी शैलीत वाचकांना गुंगवणाऱ्या मास्टर एंटरटेनर जेफ्री आर्चर यांच्या उत्कंठावर्धक कथा..*

'अ ट्विस्ट इन द टेल' या कथासंग्रहात एकूण बारा कथा आहेत. त्यापैकी काही कथांची ही झलक–

**द परफेक्ट मर्डर :** कथेचा निवेदक कॅसानोव्हा (हे त्याने फक्त कार्लासाठी धारण केलेलं नाव आहे) एका कंपनीत काम करतो. एलिझाबेद त्याची पत्नी आणि कार्ला त्याची प्रेयसी. एकदा कार्ला त्यांची ठरलेली भेट रद्द करते. तरीही कॅसानोव्हा तिला भेटायला तिच्या घरी जातो. त्यावेळी दुसऱ्याच एका पुरुषाला तो तिच्या घरातून बाहेर पडताना बघतो आणि तिच्या घरात गेल्यावर त्या माणसावरून कार्लाशी त्याचं भांडण होतं. झटापट होते. त्या झटापटीत कॅसानोव्हा तिच्या चेहऱ्यावर ठोसा हाणतो, तो तिच्या हनुवटीच्या एका बाजूला लागतो आणि ती खाली पडते. ती उठायच्या आतच कॅसानोव्हा तिथून निघून जातो; पण दुसऱ्या दिवशी त्याला कार्लाचा खून झाल्याचं समजतं आणि तो हादरतो. संशयाची सुई मात्र कॅसानोव्हाच्या आधी कार्लाकडे गेलेल्या पॉल मेन्झीस या इन्शुरन्स एजंटकडे रोखली जाते. कॅसानोव्हा या खून खटल्यात गोवला जातो का? मेन्झीसने खरंच खून केलेला असतो का? त्याचं आणि कार्लाचं प्रेमप्रकरण असतं का?

**क्लीन स्वीप इग्नेशियस :** नायजेरियाचा अर्थमंत्री म्हणून इग्नेशियस अगारबीची निवड होते. सार्वजनिक जीवनातील भ्रष्टाचार मुळापासून उखडून काढण्याचा त्याचा बेत तो जाहीर करतो आणि त्याप्रमाणे कामही सुरू करतो. त्यामुळे भ्रष्टाचाऱ्यांच्या मनात त्याच्याविषयी दहशत निर्माण होते. राष्ट्रप्रमुख जनरल ओटोबींचा विश्वासही तो संपादन करतो. परदेशी कंपन्यांच्या दलालांचे हात ओले करण्यामध्ये अजूनही अर्थविभागाचं लक्षावधी डॉलर्सचं नुकसान होत आहे, हे इग्नेशियसच्या एका अहवालावरून ओटाबींच्या लक्षात येतं. यातला बराचसा पैसा स्विस बँकांमधल्या वैयक्तिक खात्यांमध्ये जमा होत असावा, अशी शंका इग्नेशियस, ओटोबींजवळ व्यक्त करतो. त्याच्या शंकेचं निरसन होण्यासाठी कोणत्याही प्रकारे तपास करण्याची मुभा ओटोबी त्याला देतात. त्यानुसार इग्नेशियस स्विस बँकांमध्ये प्रत्यक्ष जाऊन चौकशी करण्यासाठी जिनिव्हातील एका स्विस बँकेत दाखल होतो. तिथल्या चेअरमनना तो त्यांच्या बँकेत असलेल्या नायजोरियन नागरिकांच्या खात्यांची माहिती देण्याविषयी सांगतो; पण वेगवेगळ्या प्रकारे त्या चेअरमनला समजावूनही तो चेअरमन खात्यांची माहिती द्यायला नकार देतो. शेवटी

इग्रेशियस त्या चेअरमनच्या डोक्याला पिस्तूल लावतो. पुढे काय होतं?

**अ ला कार्ट :** लष्करी सेवेतून निवृत्त झालेला ऑर्थर हॅपगुड आपल्या 'ट्रायम्फ' नावाच्या कारखान्यात नाइलाजास्तव रुजू होतो. गाड्यांना चाकं लावण्याचं काम त्याला आवडत नसतं; पण पैशासाठी त्याला ते करावं लागत असतं; मात्र आपल्या मुलाने, मार्कने खूप शिकून चांगली नोकरी करावी, असं त्याला वाटत असतं; पण 'शाळा संपल्यावर मीही तुमच्या कंपनीत चाकं लावायचं काम करणार' असं मार्क त्याला सांगतो; कारण त्याचे काही मित्रही त्याच कारखान्यात कामाला जाणार असतात. त्यावर ऑर्थर त्याला कडाडून विरोध करतो आणि त्याला सांगतो, की वर्षभर लंडनमधील एका हॉटेलमध्ये त्याने काम करावं. ते काम त्याने वर्षभर मन लावून केलं तरच त्याला 'ट्रायम्फ'मध्ये काम करता येईल. नाईलाजास्तव मार्क त्या हॉटेलमध्ये कामाला जातो. मार्क त्या हॉटेलमध्ये रुळतो की 'ट्रायम्फ'मध्ये जातो?

**नॉट द रिअल थिंग :** जेराल्ड हास्किन्स, अँजेला ब्रॅडबरा, वॉल्टर रॅम्सबॉटम हे शालेय वयापासून एकमेकांचे मित्र-मैत्रिणी असतात. जेराल्ड नंतर इंजिनिअर होतो. वॉल्टर त्याच्या वडिलांना जवाहिऱ्याच्या व्यवसायात मदत करत असतो; त्याचं आणि अँजेलाचं प्रेमप्रकरण एंगेजमेन्टपर्यंत पोचलेलं असतं; पण जेराल्ड अँजेलावर इम्प्रेशन पाडतो आणि अँजेला त्याच्याशी लग्न करते. त्यामुळे वॉल्टर दुखावतो आणि त्याच्यात व जेराल्डमध्ये एक प्रकारे स्पर्धा निर्माण होते. जेराल्ड नंतर ड्रेनेज सिस्टिम सुधारणेच्या कामात खूप नाव मिळवतो. त्याच्या आणि अँजेलाच्या विवाहाला पंचवीस वर्षं झाल्यानंतर त्याला या कामासाठी मल्टाव्हियाच्या राजाकडून 'ऑर्डर ऑफ द पीकॉक (थर्ड क्लास)' हे मानपत्र देण्यात येतं आणि राजा त्याच्या गळ्यात सोन्याचा रत्नजडित हार घालतो. त्या हारावरून पुढे काय गमतीशीर गोष्टी घडतात?

**जस्ट गुड फ्रेंड्स :** ही कथा तर फारच मजेशीर आहे. या कथेचं निवेदन एक तरुणी करते आहे असं वाटतं. ती बोलते आहे त्या कथेच्या नायकाबद्दल, रॉजरबद्दल. रॉजरच्या आणि तिच्या नात्याचं पुढे काय होणार, याची उत्सुकता वाटत असतानाच एक धक्का देऊन कथा थांबते.

**द स्टील :** ख्रिस्तोफर आणि मार्गरिट रॉबर्ट्स हे शिक्षक जोडपं दरवर्षी


भटकंतीला वेगवेगळ्या ठिकाणी जात असतं. एकदा ते भटकंतीला कार्पेटसाठी प्रसिद्ध असलेल्या टर्कीला जातात. कोणत्याही परिस्थितीत ठरवलेल्या बजेटला कार्पेट घेण्याची त्यांची तीव्र इच्छा असते. टर्कीला त्यांना त्यांच्या एका विद्यार्थ्याचे आई-वडील भेटतात. मिस्टर ॲन्ड मिसेस केंडॉल. ते थोडे 'दिखाऊ' वृत्तीचे असतात. ते ख्रिस्तोफर आणि मार्गारिटला एका कार्पेटच्या दुकानात घेऊन जातात. तिथे ते स्वत: एक मोठं कार्पेट घेतात आणि रॉबर्ट्स पती-पत्नी एक छोटं कार्पेट घेतात; पण एअरपोर्टवर सामान तपासणीच्या वेळी त्या दोन्ही कार्पेट्सच्या संबंधात एक प्रश्न उभा राहतो.

**'कर्नल बुलफ्रॉग**': ही कथा ब्रिटिश कर्नल मूर आणि जपानी मेजर साकाता यांच्या हृद्य नात्याची आहे. दुसऱ्या महायुद्धाच्या वेळेस जपान्यांनी दोस्त राष्ट्रांच्या सैन्य अधिकाऱ्यांना /सैनिकांना बंदी बनवून त्यांचा अनन्वित छळ केला. जपानने शरणागती पत्करल्यावर दोस्त राष्ट्राच्या कैद्यांची सुटका झाली आणि जपानी सैन्याच्या अधिकाऱ्यांवर खटले दाखल होऊन त्यातल्या काहींना मृत्युदंडाची तर काहींना जन्मठेपेची शिक्षा सुनावण्याचं काम सुरू झालं. त्यात मेजर साकाता, सार्जंट अकिडा आणि कॉर्पोरल सूशी या सुस्वभावी जपानी अधिकाऱ्यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात येते; पण कर्नल मूर त्या तिघांची फाशीची शिक्षा रद्द करवून त्यांना जन्मठेपेची शिक्षा देण्यात यावी, अशी विनंती कोर्टाला करतो आणि ती विनंती मान्य होते. त्यानंतर साकाता आणि मूर यांचं जीवन कसं बदलतं आणि ते दोघं एकमेकांच्या व समाजाच्या ऋणातून कसे मुक्त होतात, याची ही प्रेरणादायक कथा.

तर 'अ ट्विस्ट इन द टेल' या कथासंग्रहातील काही कथांची ही झलक. या कथांव्यतिरिक्त 'चेकमेट', 'द वाईन टेस्टर', 'अ चॅप्टर ऑफ ॲक्सिडेंट्स', 'द लूपहोल', 'क्रिस्तीना रोझनथाल' या कथा या कथासंग्रहात आहेत. धक्कादायक किंवा कलाटणी देणारा शेवट हे या सगळ्याच कथांचं वैशिष्ट्य आहे.

■

## पुस्तक परिचय




# अखेरची लढाई

**स. शं. देसाई**

*सवाई माधवराव पेशवे यांच्याप्रति असलेल्या नाना फडणीसांच्या असाधारण निष्ठेची गाथा.. पेशवाई अस्तंगत होऊ नये म्हणून केलेल्या प्रयत्नांची स्फूर्तिदायक कथा.*

'अखेरची लढाई' ही स. शं. देसाई यांची कादंबरी सवाई माधवराव पेशवे आणि नाना फडणीसांच्या जीवनातील विविध घटना-प्रसंगांवर आधारित आहे. नाना फडणीस उणीपुरी दोन तपे पेशवाईच्या कारभारात होते.

नानांना विरोध करणारी सर्व कर्तबगार माणसे निजधामास गेली होती. साहजिकच ते निरंकुश होते. तरीसुद्धा ते चतुर, द्रष्टे, धोरणी, अनुभवी आणि मुत्सद्दीपणे वागणारे होते. विरोधकांना कोंडीत पकडून, मोठ्या कौशल्याने सारे काही आपल्या मनासारखे घडवून आणण्यात ते  तरबेज होते; त्यामुळे इतकी वर्षे ते पेशव्यांचे प्रमुख कारभारी म्हणून टिकून राहिले. सवाई माधवराव पेशवे यांच्या माता-पित्याचे अकाली निधन झाले; त्यामुळे नानांनीच सुमारे वीस-एकवीस वर्षे त्यांचा आपल्या पुत्राप्रमाणे सांभाळ करत त्यांना लहानाचे मोठे केले. माधवराव लहान असल्याने नानाच पेशव्यांच्या वतीने सर्व निर्णय घेत आणि राज्यकारभार पाहत असत. पेशव्यांना त्यांनी कधी माता-पित्याची आठवण होऊ दिली नाही. पुरंदरावर त्यांचे संरक्षण करता करता नानांची दमछाक झाली.

रघुनाथरावांनी माधवरावांच्या गळ्याला जन्मतेवेळीच नख लावण्याचा प्रयत्न केला होता; त्या वेळी नानांचा आणि रघुनाथदादांचा संघर्ष झाला; त्यात जर नाना हरले असते, तर पेशवे या जगात राहिले नसते. नाना तसे न वागते, तर सवाई माधवराव पेशवे कोठे असते हे सांगणे कठीण होते. कदाचित तळकोकणातील किंवा सह्याद्रीच्या टेकड्यांमधील जुनाट किल्ल्यातील तळघरात पेशव्यांना तुरुंगाची हवा खात जीवन कंठावे लागले असते; पण सुदैवाने नानांनी माधवरावांना कशाची उणीव पडू दिली नाही. एखाद्या राजालाही हेवा वाटावा, अशा ऐश्वर्यात त्यांना ठेवले. माधवराव पेशवे जाणते झाल्यावर त्यांना वाटत होते की, नानांनी आता राज्यकारभार आपल्या हाती सोपवावा; परंतु दौलतीच्या हितासाठी म्हणून नानांनी तसे केले नाही.

नबाब निजामअलीशी नानांचे चांगले सलोख्याचे संबंध होते; परंतु मराठ्यांबाबत बदसल्ले देणारा मुशीरुद्दौला कायम निजामअलीचे कान भरत असे आणि ऐशआराम व ख्याली-खुशालीचे जीवन जगणारा निजाम 'होयबा'प्रमाणे मान डोलवून ते अमलात आणत असे. निजामअली मराठा दौलतीचे/पेशव्यांचे काही देणे लागत होता; पण मुशीरुद्दौलाच्या सांगण्यानुसार ते देण्याचे सतत पुढे ढकलत, टाळाटाळ करत होता; त्यामुळे नाना वैतागले होते, संतापले होते. त्यातच मुशीरुद्दौलाच्या प्रोत्साहनाने निजामाच्या दरबारात पेशवे, त्यांचे कारभारी नाना आणि उच्च अधिकारी

यांची सोंगे नाचविण्यात आली; साहजिकच नानांच्या रागात भरच पडली, त्यांच्या सहनशीलतेचा अंत झाला. मग त्यांनी निजामाला अद्दल घडविण्यासाठी युद्ध पुकारले आणि आपल्या चातुर्याने (व दैवाची साथ लाभल्याने) ते जिंकून निजामाला सर्व अटी मान्य करायला लावून, शरण येण्यास भाग पाडले. पेशवे आणि दौलतीसाठी नाना फडणीसांना असाच अनेकांशी सामना करावा लागला. हे करताना कारभारातले अनेक वर्षांचे सहकारी त्यांचे शत्रू झाले आणि मन घट्ट करून नानांना त्यांचा बंदोबस्त करावा लागला. एवढा दीर्घकालीन कारभार करण्याची संधी पेशवाईत आणखी कुणाच्याच वाट्याला आली नाही.


मेहता पब्लिशिंग हाऊस

BOOK CLUB

या क्लबचे सभासद व्हा. आणि उत्तमोत्तम अनुवादित पुस्तके निम्म्या किंमतीत मिळवा!

टी बुक क्लब

आजच व्हा सदस्य, निम्म्या किंमतीत मिळवा पुस्तकं

* ₹ ५० भरून 'टी बुक क्लब'चे सदस्यत्व.
* दरवर्षी सहा लोकप्रिय पुस्तकांचे अनुवाद निम्म्या किंमतीत
* योजनेतील सहाही पुस्तके घेणे बंधनकारक

टी बुक क्लब योजनेतील 'क्लासिक्स'साठी खास सवलत!
₹ १०० भरून 'टी बुक क्लब' यादीतील कोणतीही ८ किंवा
सर्व पुस्तके एकाचवेळी निम्म्या किंमतीत मिळवा. पोस्टेज खर्च अतिरिक्त.

फोन : (०२०) २४४७६९२४ ९४२०५९४६६५

सदस्यत्वासाठी ऑनलाइन लिंक - G Pay +91 94223 23039

www.mehtapublishinghouse.com/memberships.aspx

## नवी संहिता... नवा आशय...

# द रेल्वेमॅन

### एरिक लोमॅक्स

अनुवाद : **उदय बुवा**





दुसऱ्या महायुद्धात जपानी सैनिकांच्या तावडीत सापडलेल्या मित्र राष्ट्रांच्या सैनिकांच्या अनन्वित छळाचं, दास्यत्वाचं मूर्तिमंत उदाहरण म्हणजे एरिक लोमॅक्स. त्याच्या अंतर्मनात उच्छाद मांडणाऱ्या पाशवी सैनिकांपैकी एकाला तो तब्बल पन्नास वर्षांनी भेटला आणि त्याला आपल्या छळाचा जाब विचारता आला. एका असीम धैर्याचा धगधगता आविष्कार असणारी सत्यकथा...

**किंमत : ३५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

# शांघायच्या मुली


### लिसा सी

अनुवाद : **सुनंदा अमरापूरकर**




शांघायच्या उपवर मुली पर्ल आणि मेला जुगारी बाप डावावर लावतो. सक्तीच्या लग्नामुळे चीनमधून अमेरिकेची वाट पकडताना दोघींची आयुष्यं आव्हानांनी भरून जातात. या स्थलांतरात कधी असूयेची धार तर कधी प्रेमाचा वर्षाव अनुभवत दोघींना जीवन उद्ध्वस्त करणारं गुपित सांभाळावं लागतं. तरी या विलक्षण कादंबरीतल्या शांघायच्या मुली आपली मुळं अखंड जोपासतात.

**किंमत : ४९५/-रु. । पोस्टेज ५०/-रु.**




# गहाण पडलेली टेकडी

**मारिजा स्रेस** । अनुवाद : **अंजनी नरवणे**

■

*गुजरातमधील साबरकांठातल्या आदिवासी स्त्रियांच्या या कहाण्या..त्यांच्यावर झालेल्या अन्यायाच्या भीषण चित्रांबरोबरच, स्वतःच्या स्वाभिमानाच्या बळावर त्यांनी नव्यानं उभारलेल्या आयुष्याचं दर्शन घडविणाऱ्या विलक्षण सत्यकथा...*

युगोस्लाव्हियात जन्मलेल्या मारिजा स्रेस समाजसेवेचा वसा घेऊन जेव्हा गुजरातच्या दुष्काळी भागात काम करायला गेल्या तेव्हा तेथील एकूण दयनीय अवस्था (रस्ते नाहीत,

वीज नाही, सगळीकडे प्रचंड धूळ, गरिबी, उपासमार आणि सामाजिक शोषण!) त्यांनी पाहिली. त्या लोकांमध्ये मिसळण्यासाठी त्यांनी अहमदाबादच्या सेंट झेवियर्स कॉलेजमधून गुजराती भाषेत पदवी प्राप्त केली. १९७६मध्ये साबरकांठा जिल्ह्याच्या भिलोडा तालुक्यातील लुसाडिया गावी त्या जाऊन राहिल्या. येथील स्त्रियांना आर्थिक स्वातंत्र्य मिळालं, तरच परिस्थिती सुधारेल असं त्यांना वाटलं आणि त्यांनी स्त्रीसंघटना उभी केली. त्या स्त्रियांना लिहायला, वाचायला शिकवलं. लुसाडिया आणि आसपासच्या खेड्यांमध्ये त्यांनी तिथल्या स्त्रियांचं जे आयुष्य पाहिलं, त्यांचे अनुभव, मारिजा यांना स्वत:ला करावे लागलेले प्रयत्न यांचं कथारूपी चित्रण त्यांनी 'गिरीसमां एक डुंगरी' या पुस्तकातून केलं. या पुस्तकाचा अंजनी नरवणे यांनी मराठीत अनुवाद केला आहे. मराठी शीर्षक आहे 'गहाण पडलेली टेकडी.'

गुजरातच्या अत्यंत मागासलेल्या, साबरकांठा जिल्ह्यातील डोंगर टेकड्यांवरील आदिवासी भाग म्हणजे जिथे स्त्रीला अतिशय दुय्यम गणले जाते. खुद्द त्या स्वतःचं मोल एखाद्या किडामुंगीपेक्षाही कमी समजतात. तसेच, या स्त्रिया अशिक्षित आहेत. मग काय कंत्राटदाराला रस्ते बनवायला आणि ठेकेदाराला दुष्काळी व इतर कामं करून घ्यायला या बायका म्हणजे स्वस्तात मिळणाऱ्या मजूरच! स्त्री असल्यामुळे कमी मजुरीबरोबरच त्यांचं शारीरिक शोषणही होतं, तर सरकारी बाबूलोक किरकोळ सवलतींच्या बदल्यात त्यांना छळून घेतात. या सगळ्या शोषणातूनही धडपड करत कसं का होईना जिवंत राहणं, एवढाच त्यांच्या आयुष्याला अर्थ असतो. त्यांच्या या विस्कटलेल्या आयुष्याच्या आणि त्यांच्या संघर्षाच्या एकूण तेरा कथा या संग्रहात आहेत.

**'इथं तर हे नेहमीचंच'** ही कथा स्त्रीच्या परवशतेचं आणि पुरुषाच्या असीम क्रौर्याचं दर्शन घडवते. रमीलाचा नवरा वारतो. आदिवासी समाजात विधवा स्त्री म्हणजे कुठल्याही पुरुषाची मालमत्ता. उदरनिर्वाहासाठी रामजी मुकादमाच्या हाताखाली रमिलाला काम करणं भाग पडतं. रामजी इतर बायकांप्रमाणेच तिचं शारीरिक शोषण करत असतो. रमीलाची मुलगी लाली वयात आल्यावर तिच्यावरही रामजीची व ठेकेदाराची नजर पडते. ते दोघं लालीवर पाशवी बलात्कार करतात. त्यातच लालीचा अंत होतो आणि सगळं प्रकरण दडपून टाकण्यात येतं. रमीला मात्र त्या अन्यायामुळे वेडीपिशी होते.

**'ठेवलेली बाई'** या कथेतील खातरीचं लग्न नेमाशी झालेलं असतं. चार मुलं होतात आणि एकाएकी नेमाचा मृत्यू होतो. आदिवासी लोकांमध्ये अशी प्रथा असते की, त्या बाईचा नवरा गेला तर तिला माहेरी पाठवण्यात येतं. मुलं मात्र तिच्या सासरीच राहतात. त्या प्रथेप्रमाणे नेमा गेल्यानंतर खातरी तिच्या चार मुलांना सासरीच सोडून माहेरी येते; पण नेमाच्या आठवणींनी व्याकुळ होत असते. मुलांचीही आठवण येत असते तिला. त्यातच बापाने लगेच तिच्यामागे दुसऱ्या लग्नाचा लकडा लावलेला असतो. मग तिची वहिनी तिला मदत करते आणि खातरी परत सासरी जाते. हो-ना करता काही काळाने तिला दुसरं लग्न करावंच लागतं; पण ज्याच्याशी तिचं लग्न झालेलं असतं, त्याने एक बाई ठेवलेली असते; मात्र खातरी इतर बायकांप्रमाणे गप्प न बसता बंड करते.

**'दुभती गाय'** ही कथा रावतवाडा गावात मीराबेन या समाजसेविकेच्या मदतीने दूध सोसायटी सुरू करू पाहणाऱ्या आदिवासी स्त्रियांची. गंगाबेन यांनी आपलं सगळं आयुष्य आदिवासींसाठी वेचलं आहे. आता त्या वृद्ध आहेत. मीराबेन ही तरुणी त्यांच्याच पावलावर पाऊल टाकून आदिवासी स्त्रियांसाठी झटते आहे. काली आणि मणी या दोन आदिवासी स्त्रियांनी पुढाकार घेतलाय दूध सोसायटीच्या कामात. मीराबेनचं मार्गदर्शन आहेच. काली आणि मणीमधील वैमनस्य, आदिवासी स्त्रियांचं शारीरिक शोषण करणारे भ्रष्ट सरकारी बाबू, दूध सोसायटी सुरू करण्यात येणारे मानवनिर्मित अडथळे याचं वास्तव दर्शन ही कथा घडवते.

**'जो मैं ऐसा जानती'** ही कथा थोडीशी हळुवार. मकू ही सुंदर आदिवासी मुलगी हरीश नावाच्या आदिवासी मुलाच्या प्रेमात पडते. तारुण्यसुलभ आकर्षणातून दोघं जवळ येतात आणि नको ते घडतं. हरीश नामानिराळा राहतो. मकूचा गर्भपात करण्यात येतो. नंतर मकूचं लग्न होतं. मुलं होतात. संसार खूप चांगला करते ती.

**'कावीबेन म्हणजे कमालीचीच'** या कथेतील कावीबेनचा संसार खूप सुखात चाललेला असताना तिचा नवरा वारतो. स्वत:चं तारुण्य जपत मुलांचा सांभाळ करणाऱ्या कावीबेनला दुसरं लग्न करावं लागतं; पण दुसरा नवराही तिला चांगला आणि समजूतदार मिळतो.

**'बदलत्या काळाची पावलं'** कथेतील फूली तिला ठार मारू पाहणाऱ्या

नवऱ्याच्या आणि सासरच्या मंडळींच्या तावडीतून सुटून पळून आली आहे. तरीही तिला सासरी ढकलू पाहणाऱ्या माहेरच्या माणसांनाही तिने ठाम विरोध केलाय. नंतर नानजीशी लग्न करून ती सुखाचा संसार करते आहे. गावातल्या महिलांचा विकास करण्याचं काम ती करतेय; पण गावातील सरपंचाच्या निवडणुकीच्या वेळी सगळ्याच स्त्रिया तिला साथ देत नाहीत आणि नको तो उमेदवारच निवडून येतो. तरी तिचं काम चालूच राहतं.

तर अशा कथांपैकी काही कथांची ही एक झलक. या कथा वाचून एका बाजूला मन अस्वस्थ होतं. पुरुषांच्या वासनांधतेचं चीड आणणारं दर्शन या कथांतून घडतं; पण मेघा, नानजी, खेमासारखे समजूतदार पुरुषही या कथांतून भेटतात. दुसऱ्या बाजूला मीराबेन, मधूबेनसारख्या समाजसेविका या स्त्रियांसाठी झटत आहेत आणि त्यांच्यात बदल घडवत आहेत, हे पाहून आनंदही होतो; मात्र या समाजसेविकांनाही किती संघर्ष करावा लागतोय, प्रसंगी त्यांचं हे काम त्यांच्या जिवावरही बेतू शकतंय, ही बाबही अधोरेखित होते.

**नवीन सुधारित आवृत्ती**

**द पिक्चर ऑफ डोरियन ग्रे**

**ऑस्कर वाईल्ड**

अनुवाद

**वि. शं. ठकार**




एका निरागस तरुणाला मिळालेलं चिरतारुण्य आणि त्यानं स्वतःच्या हातानं करून घेतलेलं आत्मिक अधःपतन. डोरियनला चिरतरुण करण्याचं वरदान देणाऱ्या ऑस्कर वाईल्ड यांची एका शतकाहून अधिक काळ जगभरातल्या वाचकांना भुरळ पाडणारी अमेरिकन क्लासिक्स कादंबरी...

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज ५०/-रु.। ई-बुक स्वरूपात उपलब्ध**

## अभिप्राय

### नाइट





हे आत्मकथन आहे एका ज्यूचे. जो नाझींच्या छळ-छावणीतून सुटून आलाय. माणुसकीचा अंत म्हणजे ज्यूंची छळछावणी. नाझींनी पद्धतशीरपणे केलेला ज्यूंचा नरसंहार यातून दिसून येतो. कोवळ्या मुलांनी भरलेल्या गाड्या गॅस चेंबरकडे जात होत्या. भट्टीचे इंधन म्हणून जिवंत माणसे वापरली जात होती. नाझींनी कित्येक लहान मुलांना आपली आई-बहीण डोळ्यांदेखत भट्टीत जळताना जबरदस्तीने पाहायला लावली. नाझींच्या क्रौर्याच्या कहाण्या अनेक पुस्तकांतून वाचल्या गेल्यात. ट्रान्सिल्वानियातील सिघेट गावातील पंधरा वर्षांच्या ज्यू मुलाची ही कहाणी जी त्याने प्रत्यक्ष अनुभवली आहे. छळछावणीतील प्रत्यक्षात पाहिलेले दाहक अनुभव हा मुलगा आपल्याला सांगतो. सिघेट गावातील तो मुलगा आपले आई-वडील आणि तीन बहिणी यांच्याबरोबर राहतोय. एके दिवशी सिघेटमध्ये जर्मन सैनिक घुसले. त्यांनी सर्व ज्यूंना पिवळा तारा धारण करायला लावला. त्यांना हॉटेल, मंदिरात जाण्यास बंदी घातली. संध्याकाळी सहा नंतर घराबाहेर पडू नये, असा

आदेश काढला. ज्यूंच्या बंदिस्त वसाहती उभारल्या गेल्या. त्यालाच घेटो नाव दिले गेले आणि एक दिवस त्या सर्वांना सिघेटमधून हद्दपार करण्यात आले. हद्दपार केलेल्या ज्यूंना छळ छावणीत नेण्यात आले. तिथे स्त्री-पुरुष, लहान मुले यांना वेगळे केले गेले. त्यानंतर कोणीही आपल्या कुटुंबातील स्त्री-पुरुषांना पाहू शकले नाही. मग सुरू झाला फक्त छळ, अमानुष मारहाण, जनावरांनाही मिळणार नाही इतकी क्रूर वागणूक. उपासमार आणि हाडं गोठविणाऱ्या थंडीत गुरांच्या डब्यातून हजारो किलोमीटरचा प्रवास. कित्येकजण त्या भयानक थंडीत गारठून मेले. काहीजण फक्त बर्फ खाऊन जगले. गॅस चेंबरमध्ये आपला नंबर कधी येईल याची वाट पाहत राहिले. या छळछावणीतही त्या मुलाने आपल्या वडिलांची साथ सोडली नाही. प्रसंगी भयानक मारही खाल्ला. कणाकणाने आपल्या वडिलांना मरताना त्याने पाहिले. शेवटी अमेरिकन सैन्याने त्या छळछावणीवर ताबा मिळवला आणि त्याची सुटका झाली. लेखकाने ओस्लो येथे १० डिसेंबर, १९८६ रोजी नोबेल शांती पुरस्कार स्वीकारला.

**– किरण बोरकर**

■

## शिवपुत्र राजाराम




शिवछत्रपतींच्या पोटी जन्माला येणं म्हणजे थोर भाग्यच ! आणि असं बलवत्तर नशीब घेऊन जन्माला आलेले दोन राजहंस, दोन राजपुत्र म्हणजे छत्रपती संभाजी महाराज आणि छत्रपती राजाराम महाराज; पण खरंच, शिवपुत्र होणं किती भाग्याचं होतं या दोघांसाठी? त्यांच्या ‘युवराज’ आणि ‘राजपुत्र’ असण्याने अशा किती मखमली पायघड्या नशिबाने त्यांच्यासाठी अंथरल्या? की फक्त संघर्षच या दोघांच्या वाट्याला आला? आपल्या मराठी मुलखात नेहमी म्हटलं जातं, ‘आपल्या बापजाद्यांनी केलेली मेहनत ही पुढच्या पिढ्यांच्या सुखाला कारणीभूत असते.’ तसं सुख या दोन शिवपुत्रांच्या वाट्याला आलं का? शिवछत्रपतींच्या अकाली निर्वाणानंतर स्वराज्याची सारी

जबाबदारी आपल्या खांद्यावर घेऊन असंख्य आघाड्यांवर, अंतर्गत बंडाळ्यांवर मात करून अजिंक्य राहिले ते स्वराज्याचे धाकले धनी छत्रपती संभाजी महाराज. आपल्या महान पित्याने निमार्ण केलेल्या स्वराज्याच्या मातीचा साधा एक कणसुद्धा, अस्मानी संकट होऊन, पाच लाखांचा सेनासागर घेऊन, कंदहार ते काबूल अशा सलतनतीचा बादशाह स्वतः मैदानात उतरून निकराने लढत असूनसुद्धा त्याच्या हाती पडू न देणारे, सोबतच स्वराज्यातील अष्टप्रधान मंडळाने उठवलेल्या सगळ्या बंडाळ्या मोडून स्वराज्याची घडी नीट बसवणारे, रयतेचं असीम प्रेम मिळालेले आणि आपल्या बलिदानाने समस्त मावळ्यांना लढायची प्रेरणा देणारे धाकले धनी इतिहासाचा अवघ्या नऊ वर्षांचा कालावधी तेजस्वी करून टाकतात.

शंभू महाराजांच्या बलिदानानंतर स्वराज्याच्या गादीवर त्यांचे पुत्र येतील आणि त्यांच्यासह मराठी दौलतीला आपण चुटकीसरशी संपवून टाकू, असा मानस बाळगून असणाऱ्या आलमगीर औरंगजेबाला पहिला शह दिला तो महाराणी येसूबाई यांनी. पतीच्या निधनानंतर अल्पवयीन पुत्राला गादीवर बसवून स्वराज्याची सूत्रं हातात घेण्यापेक्षा त्यांनी आपल्या तरुण दिरास, शिवछत्रपतींच्या पुत्रास स्वराज्याचे छत्रपती करवून आपल्या मुरब्बीपणाची चुणूक औरंगजेबाला दाखवली. आणि इथे सुरू झाली शिवपुत्र राजाराम महाराजांची खरी कहाणी.

आभाळाएवढा कर्तृत्ववान बाप आणि सागरासारखा तुफानी कर्तृत्वाचा भाऊ अशा दोन परमप्रतापी छत्रपतींच्यानंतर गादीवर आलेल्या राजाराम महाराजांच्या हाती अवघे काही किल्ले आणि मूठभर मावळे होते. इतिकदखान नावाचा अजगर रायगडाला विळखा घालून बसलेला असताना रात्रीच्या अंधारात या नवख्या छत्रपतीला दौलतीच्या अस्तित्वासाठी राजधानी सोडून प्रतापगड गाठावा लागला, तिथून पुढे पन्हाळा आणि नंतर विशाळगड.

घरभेदी लोकांमुळे औरंगजेबास रायगड पाडणे जास्त काही अवघड गेले नाही आणि आपल्या मातु:श्री, थोरल्या वहिनी येसूबाई, शंभुपुत्र शाहू आणि प्रथम पत्नी जानकीबाई यांना होणारी कैद महाराज थांबवू शकले नाही. मराठ्यांचा हा तिसरा छत्रपती संपवून अवघा दख्खन आपल्या घोड्यांच्या टापाखाली घेण्याच्या विचाराने औरंगजेब पछाडलेला असल्याने राजाराम

महाराजांचे एका ठिकाणी वास्तव्य असणे अवघड होऊन बसले. रामचंद्रपंत अमात्य, शंकराजी सचिव आणि येसूबाई यांच्या सल्ल्याने राजाराम महाराजांनी अवघ्या काही मावळ्यांच्या सोबतीने कर्नाटककडे कूच केले. संताजी, धनाजी, खंडोजी अशा गादीशी इमान असणाऱ्या मावळ्यांसह या शिवपुत्राने बिदनूर, वेल्लोर मार्गे शिवछत्रपतींच्या काळी स्वराज्यात आलेला 'चंदी'चा किल्ला गाठला. अर्थातच त्याच्या संरक्षणाची जबाबदारी मावळ्यांवर होती. या सगळ्या प्रवासात बिदनूरची राणी चेनम्मा मराठ्यांच्या मदतीला आली.

अवघ्या मराठी मुलखाचा छत्रपती, शिवपुत्र आणि शंभू महाराजांचा धाकटा भाऊ, ज्याच्या पायी सगळ्या सुखांनी लोळण घ्यायला हवी तो दौलतीसाठी आपल्या वडील-बंधूंच्या अस्मितेसाठी वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी औरंगजेबासारखा बलाढ्य शत्रू पाठीवर घेऊन, घरादारापासून, आपल्या माणसांपासून, आपल्या मुलखापासून दूर एकटाच एका अनोळखी प्रदेशाच्या मंदिरात बसलेला दिसतो, तेव्हा त्याच्या यातना जाणवतात. जिंजीला जाऊन पोहचल्यावर स्वराज्याची घडी पुन्हा बसवण्यासाठी आपल्याजवळ असणाऱ्या मूठभर लोकांची मदत या छत्रपतींना होते.

मराठी मुलखात अवघे दोन गड हाताशी बाळगून असणारे, फक्त काही हजार मावळे संगती असताना परिस्थितीने पुरते कोलमडून जावे, अशी वेळ असताना हा शिवपुत्र मुरब्बी असं राजकारण करतो. आपल्या पित्याने आणि भावाने ज्या गोष्टींमुळे कितीतरी आपले लोक दुखावले ती 'वतनदारी' पुन्हा सुरू करण्याचा धाडसी निर्णय या मुरब्बी राजकारण्याने घेतला. या निर्णयाचा आपल्या कर्तृत्वावर होणारा परिणाम यापेक्षा स्वराज्याचं अस्तित्व महत्त्वाचं ठरवून काही वेळेस बदलावं लागतं, हा विचार त्यामागे होता. या वतनदारीच्या लोभापायी कितीतरी मुघल सरदार महाराजांच्या पदरी आले, फौजफाटा जमा व्हायला सुरवात झाली आणि जिंजीला इतिकदखान म्हणजेच झुल्फिकारखान याचा वेढा पडला.

सरदारांची जुळवाजुळव, रायगडावर झालेलं मंचकारोहण यात राहिलेला महाराजांचा राज्याभिषेक उरकून घेऊन, 'चंदी' (जिंजी) ही मराठा साम्राज्याची राजधानी झाली, अष्टप्रधान मंडळाची स्थापना झाली. संताजी यांना

सरसेनापती तर खंडोजी यांना चिटणीस आणि निळोपंतांना पेशव्यांची वस्त्रे देऊन अष्टप्रधान मंडळ स्थिर केलं आणि नंतर सुरू होते ती औरंगजेबाच्या सरदारांशी रणधुमाळी. अवघ्या जगात ज्या लढवय्या सरदारांना कोणी मात दिलेली नाही त्यांना मराठ्यांनी सळो की पळो करून सोडलं. शत्रूपेक्षा अर्धी फौज घेऊन शत्रूच्याच रस्त्यात ठाण मांडून त्याला पळवून लावण्याची धमक मराठ्यांमध्ये आलेली असते. राजा वेढ्यात अडकला म्हणून मावळ्यांनी तलवार गाजवणं थांबवलं नाही. उलट आलमगीर दक्षिणेत उतरलेला पाहून त्याचा उत्तरेतील बराच प्रदेश मराठ्यांनी मारला. त्यातच जिंजीला वेढा घातलेला औरंगजेबाचा सरदार झुल्फिकारखान फितूर झाला. महाराजांशी आतून सलोखा करून त्याने वेढा वरवर चालूच ठेवला. त्यामुळे महाराज सुखरूप दक्षिणेत पोचले.


महाराजांचे बंधू तंजावरचे अधिपती शहाजीराजे यांच्या मदतीने दक्षिणेकडे असणाऱ्या इतर राज्यांशी सलोखा करून, भविष्यात त्यांना अभय देण्याची शाश्वती देऊन महाराजांनी मुघल बादशहाच्या विरोधात मोठी मोर्चेबांधणी केली. औरंगजेबाचे दक्षिणेकडे असणारे सगळे मोठे सरदार संताजी आणि धनाजी यांच्या तलवारीने गारद झाले होते. म्हणून आता मराठ्यांना आवर घालणारा कोणीही या भूमीवर उरला नव्हता. बऱ्हाणपूर, सुरत, औरंगाबादसारखी मोठमोठी शहरं लुटून मराठ्यांनी मुघलांच्या नाकीनऊ आणले. हल्ला केलेला एक एक किल्ला मराठ्यांनी वर्ष वर्ष लढवला आणि शिबंदी संपल्यावर तो भली मोठी रक्कम घेऊन मुघलांना दिला आणि फिरून काही महिन्यांनी जिंकला, असे करून मराठ्यांनी मुघलांना पुरती मात दिली.

राजाराम महाराज महाराष्ट्रात आले आणि त्यांनी सातारा ही 'तख्ताची जागा' केली; पण तरीही त्यांची फिरस्ती सुरूच होती. सतत राजकीय उलाढाली करत औरंगजेबाच्या हाती एक चिमूटभर मातीसुद्धा लागू दिली नाही. असा हा मुरब्बी राजकारणी देवीच्या ज्वरास मात्र शह देऊ शकला नाही आणि मराठ्यांच्या तिसऱ्या छत्रपतीने औरंगजेबास ११ वर्षं झुंजवत ठेवून, मात देऊन सिंहगडावर आपला देह ठेवला.

**– सार्थक जाधव**

■

## ‘एकलव्यां’ना विश्वास देणारे पुस्तक




एक कर्तव्यदक्ष, धाडसी पोलीस अधिकारी इतकीच विश्वास नांगरे पाटील यांची ओळख मर्यादित नाही. हे नाव विश्वासार्ह ‘ब्रँड’ बनले आहे. स्पर्धा परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी तर ते जणू दैवतच. बहुसंख्य विद्यार्थी त्यांनाच आदर्श मानून या परीक्षांची तयारी करतात. अशा या ‘आयपीएस’ अधिकाऱ्याची आत्मकथा ‘मन में है विश्वास!’ या पुस्तकातून पुढे आली होती, त्यातून ‘आयपीएस’ बनण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास सर्वांसमोर आला होता. ‘कर हर मैदान फतेह’ हे पुस्तक या आत्मकथेचा दुसरा टप्पा आहे. यात ‘आयपीएस’ झाल्यानंतरचा त्यांचा आतापर्यंतचा प्रवास उलगडत जातो. ‘आयपीएस’ अधिकारी म्हणून निवड झाल्यानंतर आवश्यक प्रशिक्षण घेऊन ‘ड्यूटी’ सांभाळताना सुरुवातीच्या टप्प्यात करावा लागणारा संघर्ष आणि उच्चपदस्थ अधिकारी म्हणून नेतृत्व करताना आलेले अनुभव यात वाचायला मिळतात. प्रस्तावनेतच कॉमर्समधील परिभाषांचा वापर करत, ज्ञान व शिक्षणातल्या गुंतवणुकीच्या आधारे जीवनाचा ताळेबंद कसा उत्तम राहील, हे लेखकाने मांडले आहे. आयुष्यातील वेळेचे काटेकोर नियोजन, तीन ‘एफ’ , तीन ‘एच’, आणि तीन ‘एस’चे महत्त्वही त्यांनी सुरुवातीलाच स्पष्ट केले आहे. ‘आयपीएस’ पदी निवड झाल्यानंतर या ग्रामीण युवकाला प्रशिक्षणासाठी जावे लागले. सुरुवातीला मसुरी येथील ‘लाल बहादूर शास्त्री राष्ट्रीय प्रशासकीय अकादमी’त दाखल होताना, तिथली व्यवस्था आणि वातावरण पाहून आलेलं दडपण; त्यावर केलेली मात, त्यानंतर हैदराबाद येथील ‘सरदार वल्लभभाई पटेल राष्ट्रीय पोलीस अकादमी’तील ‘भारतीय पोलीस सेवेचे’ प्रशिक्षण आणि शेवटी ‘प्रॅक्टिकल’ प्रशिक्षण या सर्वांचे सविस्तर वर्णन आपल्याला वाचता येते. या प्रशिक्षणामुळे लागलेल्या सकारात्मक सवयी; त्यामुळे व्यक्तिमत्त्वात झालेले रचनात्मक बदल, त्याचा भविष्यातल्या आव्हानांना तोंड देताना झालेला फायदा, या बाबी लेखकाने प्रांजळपणे मांडल्या आहेत. ज्यांना या अकादमीत जाऊन प्रशिक्षण घेता येत नाही, त्यांना ही प्रक्रिया समजावून देण्याचा प्रयत्न नांगरे पाटील यांनी या

पुस्तकाद्वारे केला आहे. या प्रशिक्षणात उलगडत गेलेले कायद्याचे स्वरूप, तपासाचे कौशल्य, व्यूहरचना, निरीक्षणक्षमता, पुरावे गोळा करण्याचे कसब, नेतृत्वगुण, कम्युनिटी पोलिसिंग आदींचा उल्लेख पुस्तकात ओघाने येत राहतो. प्रशिक्षणानंतर कायदा आणि सुव्यवस्थेच्या पोलादी चौकटीत शिरतानाचे अनुभव, सेवेदरम्यान रोज नवी आव्हाने, बदलत्या अपेक्षा, गणवेषाचा अन्वयार्थ लावण्याचा प्रयत्न, मुथूट दरोडा, चाकण दंगल, डॉल्बीमुक्त गणेशोत्सव अशा काही घटनांचे तपशीलही या पुस्तकात येत जातात. सुभाषिते, वचने, श्लोक, अवतरणे, संदेशांचा वापर केल्याने, हे लेखन अतिशय ओघवत्या शैलीत झाले आहे. विशेष म्हणेज, हे पुस्तक त्यांनी पोलीस दलातील सर्व करोना योद्ध्यांना समर्पित केले आहे. 'माझ्यासारख्या तळागाळातल्या, कष्टकऱ्यांच्या, कामगारांच्या घरातल्या अपुऱ्या साधन-सामग्रीनं आणि पराकोटीच्या ध्येयनिष्ठेनं कुठल्या तरी कोपऱ्यात ज्ञानसाधना करणाऱ्या अनेक 'एकलव्यां'ना दिशा दाखवण्यासाठी मी हा पुस्तकप्रपंच केला आहे,' असे नांगरे पाटील म्हणतात. एकूणच अशा एकलव्यांना मैदान 'फतेह' करण्याचा 'विश्वास' देणारे हे पुस्तक आहे, असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

**– महाराष्ट्र टाइम्स, २४.२.२०२१**

■

## कोमा




एक छोट्याश्या शस्त्रक्रियेसाठी रुग्ण इस्पितळात दाखल होतो. शस्त्रक्रियेनंतर काही तासांत घरी जाणार या तयारीने आलेला रुग्ण बेशुद्धावस्थेत जाण्याचं काय कारण असावं? तो शुद्धीत येत नाही. डॉक्टरांकडून काही चूक झाली, भूलतज्ज्ञांकडून काही चूक झाली? की आणखी काही? डोक्याला मुंग्या आणणारे कथानक, नाट्यपूर्ण मांडणी, उत्तरोत्तर ताणलं जाणारं रहस्य. त्याचा मागोवा घेणारी सुझान. एक भन्नाट वाचनानुभव.

**– शैलेश पुराणिक**

■

१६ मार्च ते १५ एप्रिल २०२० दरम्यानचा दिनविशेष

दिनविशेषानिमित्त पुस्तकसंचावर **५० टक्क्यांपर्यंत सूट**

**खालील संचांवर १६ ते ३१ मार्च दरम्यान खास सवलत**

**१६ मार्च - झोई जेनी यांचा जन्मदिन**

'आकाश बदलताना' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १६०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**१७ मार्च - बाळ भागवत यांचा जन्मदिन**

'देव? छे! परग्रहावरील अंतराळवीर!' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २००/- । सवलत किंमत १२९/-**

---

**१७ मार्च - फ्रँक बंकर गिलब्रेथ यांचा जन्मदिन**

'चीपर बाय दी डझन' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**१९ मार्च - आयर्विंग वॅलेस यांचा जन्मदिन**

'सेकंड लेडी', 'द गेस्ट ऑफ ऑनर', 'द मिरॅकल', 'द सेव्हन्थ सिक्रेट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १२४५/- । सवलत किंमत ६९९/-**

---

**२० मार्च - विल्यम डॅलरिंपल यांचा जन्मदिन**

'व्हाइट मुघल्स', 'रिटर्न ऑफ अ किंग' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०४५/- । सवलत किंमत ५९९/-**

---

**२२ मार्च - सुभाष दांडेकर यांचा जन्मदिन**

'चाळिशीनंतरची वाटचाल', 'वेदना आणि व्याधींसह चांगलं जीवन', 'व्याधिमुक्त' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**२३ मार्च - डॉ. डेव्हिड जे. श्वार्त्झ यांचा जन्मदिन**

'द मॅजिक ऑफ थिंकींग बिग', 'द मॅजिक ऑफ थिंकिंग सक्सेस' 'द

मॅजिक ऑफ गेटिंग व्हॉट यू वॉन्ट' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७९०/- । सवलत किंमत ४९९/-**

---

**२५ मार्च - व. पु. काळे यांचा जन्मदिन**

व. पु. काळे यांच्या सर्व पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७४१५/- । सवलत किंमत ४२९९/-**

---

**२५ मार्च - टॉम मोनाघन यांचा जन्मदिन**

'पिझ्झा टायगर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४२०/- । सवलत किंमत २२९/-**

---

**२६ मार्च - राहुल गोखले यांचा जन्मदिन**

'विज्ञानातील सरस आणि सुरस' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १०९/-**

---

**२६ मार्च - व्हिक्टर फ्रॅन्कल यांचा जन्मदिन**

'अर्थाच्या शोधात' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**२६ मार्च - राजशेखर हिरेमठ यांचा जन्मदिन**

'मराठी व्याकरण परिचय' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**२६ मार्च - उमेश कदम यांचा जन्मदिन**

'एक होता मित्र', 'केवळ मैत्रीसाठी', 'संहार', 'उद्‌ध्वस्त' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ७४०/- । सवलत किंमत ४४९/-**

---

**२९ मार्च - डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांचा जन्मदिन**

'शेतकऱ्याचा असूड : महात्मा जोतीराव फुले' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १४०/- । सवलत किंमत ८९/-**

---

**२९ मार्च - विवेक शानभाग यांचा जन्मदिन**

'घाचर घोचर' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १५०/- । सवलत किंमत ९९/-**

---

**३० मार्च - मणी भौमिक यांचा जन्मदिन**
'परमेश्वर : एक सांकेतिक नाव' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १५९/-**

---

**३० मार्च - फिलिप गूल्ड यांचा जन्मदिन**
'आयुष्याचा अंतिम संस्कार' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत ११९/-**

**खालील संचांवर १ ते १५ एप्रिल दरम्यान खास सवलत**

**१ एप्रिल - सुधा पाटील यांचा जन्मदिन**
'बाल परिचर्या' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २८०/- । सवलत किंमत १६९/-**

---

**१ एप्रिल - सुरेश वसंत नाईक यांचा जन्मदिन**
'कविता दोघांची...', 'या सुखांनो' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ३३०/- । सवलत किंमत १९९/-**

---

**३ एप्रिल - किशोर पवार यांचा जन्मदिन**
'आपली सृष्टी' मालिकेतील १० पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत
**संचाची मूळ किंमत ११००/- । सवलत किंमत ६४९/-**

---

**४ एप्रिल - सौरभ दुग्गल यांचा जन्मदिन**
'आखाडा' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत २२०/- । सवलत किंमत १३९/-**

---

**५ एप्रिल - जोसेफ लेलिव्हेल्ड यांचा जन्मदिन**
'महात्मा गांधी आणि त्यांचा भारतीय संघर्ष' या पुस्तकावर विशेष सवलत
**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत २९९/-**

---

**५ एप्रिल - व्यंकटेश माडगूळकर यांचा जन्मदिन**

व्यंकटेश माडगूळकर यांच्या ४१ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५३२५/- । सवलत किंमत ३१९९/-**

---

**७ एप्रिल - जागतिक आरोग्यदिन**

संच १ - 'आरोग्यासाठी योग', 'चला जाणून घेऊ या! आहार आणि आरोग्य', 'चला जाणून घेऊ या! शाकाहार', चिकन सूप फॉर द सोल अस्थमा', 'चिकन सूप फॉर द सोल बॅक पेन', 'हृदयाचे पुनरुज्जीवन करणारे ई.ई.सी.पी. तंत्र', 'हृदयविकार निवारण', 'चाळिशीनंतरची वाटचाल', '२० मिनिटे तंदुरुस्तीसाठी', 'डॉक्टरांकडे जाण्यापूर्वी' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १६८५/- । सवलत किंमत १०९९/-**

संच २ - 'फिट फॉर ५०+ फॉर मेन', 'फिट फॉर ५०+ फॉर विमेन', 'रूप करा सुरूप', 'गर्भसंस्कार', 'मिरॅक्युलस इफेक्ट्स ऑफ ॲक्युप्रेशर' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०८०/- । सवलत किंमत ७०९/-**

---

**७ एप्रिल - अतुल कहाते यांचा जन्मदिन**

'ॲडॉल्फ हिटलर', 'अमेरिकी राष्ट्रपती', 'अंतराळ स्पर्धा', 'हिलरी क्लिंटन', रुपेरी सिंधू', 'स्टीव्ह जॉब्ज : एक झपाटलेला तंत्रज्ञ!', 'वॉरन बफे', 'वॉरन बफेच्या यशाचे ५० मंत्र' या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत २०८५/- । सवलत किंमत १३१९/-**

---

**८ एप्रिल - रणजित देसाई यांचा जन्मदिन**

रणजित देसाई यांच्या ४२ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ६६०५/- । सवलत किंमत ४५९९/-**

---

**१० एप्रिल - वर्षा अडालजा यांचा जन्मदिन**

'अणसार' या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३५०/- । सवलत किंमत २०९/-**

---

**१० एप्रिल - एच.व्ही. सरदेसाई यांचा जन्मदिन**

‘धन्वंतरी घरोघरी’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत १८०/- । सवलत किंमत १२९/-**

**११ एप्रिल - डॉ. सुनीलकुमार लवटे यांचा जन्मदिन**

‘भारतीय साहित्यिक’, ‘खाली जमीन वर आकाश’, ‘समकालीन साहित्यिक’, ‘वाङ्मय विचार’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ८५०/- । सवलत किंमत ४९९/-**

‘IN BETWEEN’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ३९५/- । सवलत किंमत २३९/-**

**११ एप्रिल - महात्मा फुले यांचा जन्मदिन**

‘शेतकऱ्याचा असूड’, ‘महात्मा’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५९०/- । सवलत किंमत ३४९/-**

**१२ एप्रिल - छाया महाजन यांचा जन्मदिन**

‘कॉलेज’, ‘मानसी’, ‘एकादश कथा’, ‘यशोदा’, ‘मुलखावेगळा’, ‘अज्ञात’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०३०/- । सवलत किंमत ५९९/-**

**१३ एप्रिल - जालियनवाला बाग हत्याकांड दिन**

‘जालियनवाला बाग’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ४९५/- । सवलत किंमत ३३९/-**

**१४ एप्रिल - द. मा. मिरासदार यांचा जन्मदिन**

द. मा . मिरासदार यांच्या २५ पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३३४०/- । सवलत किंमत २०२९/-**

**१४ एप्रिल - आशा आपराद यांचा जन्मदिन**

‘भोगले जे दुःख त्याला’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २५०/- । सवलत किंमत १४९/-**

**१४ एप्रिल - डॉ. रवींद्र ठाकूर यांचा जन्मदिन**

‘व्हायरस’, ‘महात्मा’, ‘धर्मयुद्ध’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत १०९५/- । सवलत किंमत ६४९/-**

‘MAHATMA JYOTIRAO PHULE’ (English) या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत ७९५/- । सवलत किंमत ५४९/-**

---

**१५ एप्रिल - जेफ्री आर्चर यांचा जन्मदिन**

‘अ प्रिझनर ऑफ बर्थ’, ‘अॅन्ड देअरबाय हँग्ज अ टेल’, ‘बी केअरफुल व्हॉट यू विश फॉर’, ‘बेस्ट केप्ट सीक्रेट’, ‘कॅट ओ’नाईन टेल्स’, ‘फॉल्स इम्प्रेशन’, ‘केन अँड एबल’, ‘नॉट अ पेनी मोअर, नॉट अ पेनी लेस’, ‘ओन्ली टाइम विल टेल’, ‘पाथ्स ऑफ ग्लॉरी’, ‘सन्स ऑफ फॉर्च्यून’, ‘द सिन्स ऑफ द फादर’, ‘टू कट अ लाँग स्टोरी शॉर्ट’, ‘ट्वेल्व्ह रेड हेरिंग्ज’, ‘अ क्विव्हर फुल ऑफ अॅरोज’, ‘अ ट्विस्ट इन द टेल’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ५८७०/- । सवलत किंमत २८९९/-**

---

**१५ एप्रिल - रवीन्द्र बागडे यांचा जन्मदिन**

‘बोचकं’, ‘गटुळं’ या पुस्तकांच्या संचावर विशेष सवलत

**संचाची मूळ किंमत ३२०/- । सवलत किंमत १७९/-**

---

**१५ एप्रिल - डॉ. लक्ष्मीनारायण बोल्ली यांचा जन्मदिन**

‘कृष्णदेवराय’ या पुस्तकावर विशेष सवलत

**मूळ किंमत २७०/- । सवलत किंमत १५९/-**


**❖ किमतींमध्ये बदलाची शक्यता ❖**

**अधिक माहितीसाठी संपर्क :** फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२ / **Whats App No. ९४२०५९४६६५**

**website : www.mehtapublishinghouse.com**


**आपल्या लाडक्या लेखकांना शुभेच्छा या ईमेलवर पाठवा.**


**author@mehtapublishinghouse.com**

## अद्‌भुत, कल्पनारम्य विज्ञानकथांची मालिका
## The Time Quintet प्रथमच मराठीत...




- ★ कालपटलावरील सुरकुती
- ★ दारातील वादळ
- ★ वेगाने कलणारा ग्रह
- ★ अमाप पाणी
- ★ अनुकूल काळ






मूळ लेखक

**मॅडेलिन लेन्गल**


अनुवाद

मुग्धा गोखले










'Registered' Postal Reg. No. PCW/086/2021 – 2023
RNI. No. MAHMAR/2000/02739
No. CSO/Pune City/SR/3/2021 - Date : 10/01/2021
Posting at BPC - Vishrambaug Wada, CSO, Pune - 411030.
Publication Date : 09/03/2021 Posting Date : 11/03/2021


## नवीन संहिता... नवा आशय...

















**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,